# शके १८५३ च्या श्री साईबाबा शिरडी संस्थानच्या श्री गुरुपौर्णिमेच्या जमाखर्चाचा तक्ता

| जमा | | खर्च | |
|---|---|---|---|
| ५३।≡ । | श्रीसमर्थांचे पेटीपैकीं उत्पन्न | २०७।≈। | श्री मुदबक खर्च |
| २६९।= ॥ | श्री भक्तमंडळीकडून आलेली वर्गणी. सोबत तपशीली यादी असे. | १२ | गहूं मण २ |
| १४४८≈॥। | श्रीमंतकेशवराव गोपाळराव बुटी आणि बंधू यांचेकडून | ४४८-॥ | तांदूळ |
| | | २४ | बारीक मण १ |
| | | २०८-॥ | ठोकळ मण १८७ |
| | | ९८≈ | डाळ तुरीची १० पायली |
| | | ४।≈ | दाळ छोल्याची ६॥ |
| | | ३ | गहूं शेर १५ |
| | | २२॥≈ | साखऱ्या मण २८२ |
| | | १२।≡। | गूळ |
| | | १४॥ | पत्रावळी व द्रोण |
| | | ३३।८॥ | तूप शेर |
| | | १३।≈॥ | तेल गोड डबा १ |
| | | ५।≈॥ | शाक भाजी |
| | | १०॥।-॥ | दूध, दहीं |
| | | .॥८॥ | मीठ पायली ३॥ |
| | | १॥≈ | तूप शेर २ |
| | | १ | लवंग |
| | | २॥ | काथ १ शेर |
| | | .॥- | खोबरें २ शेर |
| | | ८-॥ | आगपेटी |
| | | .॥- | बदाम, खारीक |
| | | १८≡ | खिसमीस, दाणे |
| | | .।-॥ | विलायची,मोहरी,साबूदाणा |
| | | .।- | मिरची, हळद |
| | | १०॥≈। | सरपण |
| | | १८-॥ | भोजन दक्षिणा |
| | | .॥-॥ | कपडा स्वयंपाकाकरितां |
| ४६७-०-६ | | २०७।≈। | |

खर्च

२०७।=।

४॥।=॥। पूजेबद्दल खर्च

.।- नारळ २

८≡ बुका

.॥। खडी साखर

.। गुलाल

१।=॥। चिल्लर पूजेचें सामान

२ देणें पूजाऱ्याला

४॥।=॥।

८८।=॥। मजूरी एकंदर

२१॥≡॥। सामान तयारी

४॥। गाडी भाडें.

७॥८। भिकार भोजनाबद्दल

५४।=॥। पुरुषोत्तम आचारी

४० मेहनतींना

१४।=॥। रेल्वे खर्च,
मोटर खर्च

८८।=॥।

४३॥८॥ भक्तमंडळींना निमंत्रणपत्रिका
व प्रसाद पाठविण्याबद्दल खर्च

७ पत्रिका छपाई खर्च

१३।-॥ पोस्टेज सदर

॥।≡ प्रसादासाठीं लेबलें

२२। प्रसाद पाठविण्याबद्दल व
प्रसाद तयारी.

२॥ कपडा

१। पिशव्या शिलई

.।. धागा, रील

३८= साखर १० शेर

।= सुंठ

८= रद्दी कागद

१४॥= टपाल खर्च

४३॥८॥

खर्च

९०॥८। शिवाय खर्च

६० कीर्तनाबद्दल विश्वास बुवा यांस देणें

१५ ब्यांडबद्दल खर्च

८॥।- रोषनाई खर्च

१॥।८॥। घोड्याकडे गवत, दाणा

५८=॥ भूयसी दक्षिणा वगैरे

९०॥।८।

४३५-०-६

खर्च

४३५८८॥

३२ श्री समर्थांचे समाधीकरितां पीतांबर खरेदी,

४६७८८॥

# श्रीसाईबाबा प्रसन्न

श्रीसाईबाबा शिरडी संस्थानचे तहाहयात ट्रस्टी व शके १८५३ मध्यें तीन वर्षांकरितां निवडून आलेलें सभासदांचें कार्यकारी मंडळ.


राव बहादूर मोरेश्वर विश्वनाथ प्रधान ट्रस्टी

,, ,, सखाराम बळवंत धुमाळ ,,

रावसाहेब बाळकृष्ण विश्वनाथ देव ,,

श्रीयुत तात्याजी गणपत पाटील कोते ,,

,, वासुदेव नारायण चांदोरकर ,,

ह. भ. प. दासगणू अध्यक्ष

श्रीयुत सुंदरराव दीनानाथ नवलकर आ. चिटणीस

,, बापुराव राघवजी बोरावके आ. दुय्यम चिटणीस

,, रामचंद्र आत्माराम तर्खड आ. खजिनदार

,, रघुवीर भास्कर पुरंदरे आ. दुय्यम खजिनदार

श्रीमंत केशवराव गोपाळराव बुटि

श्रीयुत यशवंत जनार्दन गाळवणकर

,, गोविंद काशीनाथ गाडगीळ

,, माधवराव बळवंत देशपांडे

,, वसंतराव नारायण गोरक्षकर.


## श्री साईभक्तांस विनंति

श्री साईभक्तांस सप्रेम विनंति करण्यांत येत आहे कीं, पुष्कळ पत्त्यांत फेरफार झाल्यामुळें त्यांना पोस्टांतून पाठविलेल्या उत्सवाच्या निमंत्रणपत्रिका व प्रसाद न पोंचतां परत येतात, तर कृपा करून त्यांनीं आपले पत्ते फेरबदल झाल्यास आम्हांस कळवावे.

**सुंदरराव दिनानाथ नवलकर,**

आ. चिटणीस,

श्री साईबाबा शिरडी संस्थान.

# अहल्योद्धार

अहल्योद्धार हें प्रकरण वाल्मीकि रामायण, अध्यात्म रामायण, आनंद, रामायण, वेद व महाभारत इत्यादि ग्रंथांतून वर्णन केलें आहे. त्या प्रत्येक ग्रंथांतील कथानक सारांशरूपानें देऊन नंतर त्याचा ऐतिहासिकदृष्टया विचार करूं. प्रथम वाल्मीकि या प्रकरणासंबंधानें काय म्हणतात तें पाहूं.

श्री रामचंद्र विश्वामित्राबरोबर गेल्यावर त्याच्या यज्ञांत विघ्न करणाऱ्या राक्षसांचा संहार करून अयोध्येस परत जाण्याची आज्ञा मागूं लागले, तेव्हां त्या आश्रमांतील सर्व ऋषि म्हणाले, "मैथिलस्य नरश्रेष्ठ जनकस्य भविष्यति यज्ञः परमधर्मिष्ठस्तस्य यास्यामहेवयम् ॥ ६ ॥" त्वंचैव नरशार्दूल सहास्माभिर्गमिष्यसि ॥ अद्भुतं च धनूरत्नं तत्रत्वंद्रष्टु मर्हसि ॥ ७ ॥ ( वा. रा. १।३१) असें सांगून ते सर्व ऋषि निघाले. व त्यांच्याबरोबर श्रीरामही निघाले. मार्गांत त्यांना गंगा ( भागीरथी ) नदी लागली. त्या वेळेस श्रीरामानें गंगोत्पत्तीबद्दल प्रश्न केला व विश्वामित्रानें ती सांगितली. असें लिहिलें.* आहे. रात्रीं त्या नदीवर मुक्काम केल्यावर दुसरे दिवशीं ते सर्व गंगा नदी उतरून पलीकडे गेले. तेव्हां मार्गांत त्यांना विशाला नगरी लागली. त्या नगरीचं माहिती करून दिल्यावर विश्वामित्र पुढें चालले. तों त्यांना मिथिला नगरीच्या जवळ असलेला गौतमाचा आश्रम दिसला. हा आश्रम मिथिला नगरीच्या जवळ असलेल्या बगीच्यांत होता असें "मिथिलोपवने तत्र आश्रमं दृश्य राघवः ( वा. रा. १।४८।११, ह्या वचनावरून समजतें. तो आश्रम पाहून श्रीरामानें त्याची माहिती विचारली व विश्वामित्रांनीं ती सांगितली. नंतर रामलक्ष्मणांनीं आश्रमांत जाऊन तपश्चर्या करीत असलेल्या दिव्यदेहधारी अहल्येला नमस्कार केला व तिनेंही निष्कामबुद्धीनें श्रीरामाचा सत्कार केला.× नंतर जिनें एक

---

* हें प्रकरण प्रक्षिप्त आहे. गंगावतरण पाहा.

× गौतमाचा वेष घेऊन इंद्र आला हें जाणून अहल्या त्याच्यावर आसक्त झाली॥ व त्याच्याशीं ती रममाण झाली. हें जाणून गौतम अहल्येस म्हणाला, ' यदात्वेतद्वनं घोरं रामोदशरथात्मजः । आगमिष्यति दुर्धर्षस्तदापूता भविष्यसि ॥ ३१ ॥ तस्यातिथ्येन दुर्वृत्ते लोभमोह विवर्जिता। मत्सकाशं मुदायुक्ता स्ववपुर्धार विष्यसि ॥ ३२ ॥

वेळ दुराचरण केलें, पण त्याच्या निरसनार्थ पतीची आज्ञा पाळून कडक तपश्चर्या केली ती त्या तपश्चर्येनें शुद्ध झाली व सौंदर्यवान श्रीरामाला पाहूनही जिची मति चंचल झाली नाहीं ती खरोखर पवित्र आहे असें मानून श्रीरामांनीं तिच्या आतिथ्याचा स्वीकार केला. अर्थात श्रीरामांनीं तिचा उद्धार × केला. हें समजतांच गौतम आले व त्यांनीं श्रीरामाला मेजवानी करून अहल्येचा स्वीकार केला व नंतर रामलक्ष्मण विश्वामित्रासह मिथिला नगरीकडे निघून गेले.

---

×भारतवर्षीय प्राचीन ऐतिहासिक कोशामध्यें ( वा. रा. बा. कां. स. ४८ व ४९ मध्यें व उ. कां. स. ३० चा दाखला देऊन ) लिहिलें आहे कीं, " गौतमानें अहल्येस शिला हो," असा शाप दिला व तिनें उःशाप मागितल्यावरून त्यानें दाशरथी रामाच्या पदरजःकणानें पूर्ववत् होशील असा तिला वर दिला. याप्रमाणें हिचा पुढें उद्धार झाला. " ( भा. व. प्रा. ऐ. कोश पान ३४ अहल्या श. पहा. ) पण हें सपशेल खोटें आहे. बालकांडांत कोशकारानें लिहिलेल्या कथानकाचा पत्ता नाहीं. उलट या कथेवर ' पुराणादिप्रसिद्ध शिलारूपप्राप्ति शापस्तुकल्पांतरेण ' अशी टीका आहे. अर्थात् शिला झाल्याची गोष्ट वाल्मीकींत नसून ती इतर पुराणांत आहे असें म्हणून ' शापदग्धापुराभर्त्रा रामशक्रापराधतः । अहल्याख्या शिलाजज्ञे शतलिंगः कृतस्वराट् ' हें पद्य पुराणांतील वचन दिलें. ( वा. रा. १-४८-३० वरील टीका पहा. ) ह्यावरून अहल्या शिला झाली हें वा. रा. बालकांडांत नाहीं हें सिद्ध झालें. आतां उत्तर कांडांत काय आहे तें पाहा. इंद्रजितानें इंद्राचा पराभव केल्यावर इंद्र निस्तेज झाला. तेव्हां ब्रह्मदेव त्याला म्हणाला,-" पूर्वीं त्वां गौतमाच्या स्त्रियेचें पातिव्रत्य भ्रष्ट केलेंस त्या वेळेस गौतमानें ' ज्या अर्थीं तूं निःशंकपणें माझ्या पत्नीचा उपभोग घेतलास त्या अर्थीं तूं समरांगणामध्यें शत्रूच्या हस्तगत होशील आणि हे दुर्बुद्धे, त्वां जें हें पापकर्म जगतामध्यें प्रवृत्त केलें तें मनुष्यलोकामध्यें सुरू होईल. ( कारण ' यद्यदाचरति श्रेष्ठ स्तत्तदेवेतरोजनः । सयत्प्रमाणं कुरुते लोकस्तदनु वर्तते ' ) असें वचन आहे. व त्या लोकामध्यें जो जारकर्म करील त्याचें अर्धें पातक तो भोगील व अर्धें तुला भोगावें लागेल, व या पापकर्मामुळें तुझें इंद्रपद स्थिर राहाणार नाहीं. ' असा तुला शाप दिला. आणि ' ज्या अर्थीं रूप व यौवन ह्यांनीं संपन्न असलेली तूं स्थिर राहिली नाहींस त्या अर्थीं जगतामध्यें तूं एकटीच रूपवती राहाणार नाहींस. सर्वही प्रजा तुझें रूप वाटून घेतील. ' ( अर्थात् त्या योगानें तुझें सौंदर्य कमी होईल. ) असा

ह्याप्रमाणें वाल्मीकींत हकीकत आहे. आतां याच प्रकारासंबंधानें अध्यात्म रामायणकार काय म्हणतात तें पाहा.

श्रीरामचंद्र विश्वामित्रासह मिथिलानगरीस जात असतां मार्गांत त्यांना गंगानदी लागली असें अध्यात्मांत लिहिलें. ती नदी तरून जातेसमयीं श्रीराम नावेंत बसत असतां नावाडी म्हणाला, "रामा, 'क्षालयामि तवपादपंकजंनाथ दृषदोः किमंतरम् ॥ मानुषी करण चूर्ण मस्तिते पादयोरिति कथा प्रतीयसि ॥' (अ. रा. १।६।३) असें म्हणण्याला आधार काय तर 'दुष्टेत्वं तिष्ठ दुर्वृत्ते शिलाया-माश्रमे मम' हें त्याच रामायणांतील वचन कोणी कोणी पुढें आणतात. ( अ. रा. १।५।२७ ) पण ह्या वचनांत 'शिला हो' असें लिहिलें नाहीं. माझ्या आश्रमांत दगडावर बसली राहा अथवा जहल्लक्षणेनें 'गंगायां घोषः' या उदाहरणाप्रमाणें दगडाजवळ राहा असा त्या वाक्याचा अर्थ होतो. जर दगड हो असा गौतमांनीं शाप दिला असता तर ' निराहारा दिवारात्रंतपः परममा-स्थिता ॥ आतपानिल वर्षादिसहिष्णुः परमेश्वरम् ॥ ध्यायन्ती राममेकाग्रमन-

---

त्यानें अहल्येस शाप दिला. तेव्हांपासून पुष्कळ स्त्रिया रूपसंपन्न होऊं लागल्या. अहल्येला शाप दिल्यावर ती म्हणाली, ' हें विप्र देवानें आपलें रूप धारण केलेलें मला न समजल्यामुळें त्यानें माझा उपभोग घेतला. माझ्या इच्छेनें त्याला उपभोग घडला नाहीं. म्हणून आपण मजवर कृपा करावी. ' असें तिनें म्हटल्यावर ' इक्ष्वा-कुवंशामध्यें महातेजस्वी राम उत्पन्न होईल. तो मनुष्यरूप धारण केलेला विष्णु ब्राह्मणाकरितां रानामध्यें येईल. त्याचें आदरातिथ्य तूं करशील तेव्हां त्याचे दर्शनानें तूं पवित्र होऊन माझ्या समीप येशील. ' ह्याप्रमाणें बोलून तो तपास निघून गेला. व ती तेथें फारच मोठें तप करूं लागली. सारांश, " अशा पापामुळें तुला असें दुःख भोगावें लागलें. याकरितां तूं आतां वैष्णव याग कर म्हणजे पापमुक्त होशील. " असें त्या ब्रह्मदेवानें इंद्रास सांगितलें. ( वा. रा. उ. कां. स. ३१ ) ह्यांतही ' दगड हो ' असा गौतमानें अहल्येस शाप दिला हें लिहिलें नाहीं व रामानें दगडाची स्त्री केली नाहीं. अर्थात् भारतवर्षीय प्राचीन ऐतिहासिक कोशकारानें जें लिहिलें तें चूक आहे, असें म्हणणें भाग पडतें.

साह्वदि ॥'' अ. रा. १।५।२८।२९ असें गौतमानें म्हटलें नसतें. कारण हें आज्ञापालन व्रत दगड करूं शकत नाहीं. शिवाय गौतम रागावला तेव्हां अहल्या कुटींत होती. तेथें उष्णता व जल यांचा संपर्क होणें संभवत नाहीं. कदाचित तिला कुटीच्या बाहेर बोलावून त्यानें तिला दगड केलें अशी कल्पना करून अध्यात्माची बाजू सांवरून धरली तरी गौतमाच्या आश्रमाच्या पलीकडे गंगानदी मुळींच नाहीं असें वाल्मीकीवरून दिसतें व अनुभवही × तसाच आहे; परंतु रामायण कालानंतर तीन हजार वर्षांनीं म्हणजे इ. स. सातवें शतकांत तयार झालेल्या अध्यात्म रामायणकाराला श्रीरामाच्या अंगीं कर्तुम-कर्तुंअन्यथा कर्तुम् ही शक्ति आहे हें दाखवून ते विष्णूच होत असें आरंभा-पासून वर्णन केल्यामुळें त्यांच्या अंगीं अद्भुत सामर्थ्य लावलें व त्याचाच अनु-वाद इतर* कवींनीं केला; पण हें वर्णन ऐतिहासिकदृष्ट्या असत्य ठरतें.

---

× काशीनिवासी वीरराघवाचार्य रामानुजी हे मिथिलेस जाऊन आलेले सांगतात कीं, गौतमाचा आश्रम हिमालयाच्या पायथ्याशीं आहे. ( वास्तविक हा शिवालिक पहाड होय. ) गौतमाचा आश्रम व मिथिला यांच्यामध्यें गंगा नदी नाहीं. अर्थात् अध्यात्मांतील कोळ्याचा प्रसंग चूक आहे.

*तुलसीदासानें बहुतेक कथाभाग अध्यात्मावरून घेतला असें रामेश्वर भट्ट तुलसीकृत रामायणाच्या भूमिकेंत लिहितात. ( तु. ए. भू. पा. ९ नि. सा. प्रे. प्र. ) त्या रामायणांत अध्यात्माप्रमाणें अहल्योद्धार झाल्यावर 'चले राम लक्ष्मण मुनिसंगा। गएजहांजग पावनि गंगा' असें लिहून जें प्रक्षिप्त कथानक अहल्योद्धाराच्या पूर्वीं वाल्मीकींत लिहिलें तोच कथा प्रसंग 'चले राम' या चौपाईचे नंतर वर्णन केला; पण तो तुलसीकृत नव्हे क्षेपक आहे असें तेथें लिहिलें; पण तेथेंही नावाड्याची गोष्ट लिहिली नाहीं. आमच्या मतें क्षेपकाच्या पूर्वींची चौपाई 'चले रामलक्ष्मण' व शेवटली 'तब प्रभु ऋषिसमेत अन्हाये। विविध दान महिदेव न पाये' ह्या चौपाया क्षेपक आहेत. कारण यांचा संबंध रामकथेशीं नसून क्षेपकाशीं आहे. व हें सर्व वर्णन वंध्येच्या पुत्राच्या लग्नप्रसंगाच्या वर्णनासारखें आहे. असेंच वर्णन बहुतेक मराठी कवींनीं केलें; पण ही सर्व अंधश्रद्धा.

आनंदी रामायणांत, रामलक्ष्मण संयुक्तोमुनिस्तं (मिथिला) नगरं ययौ ॥ गमनावसरे मार्गे भर्तृशप्तां शिलांमुनिः ॥ १ ॥ मुनिरूप महेंद्रेण भुक्तां रहसि शोभनां ॥ गौतमस्यांगतां नाम्ना अहल्यां कथयत्तयोः ॥ १७ ॥ " नंतर " नदीरूपा जनस्थानें अहल्या गौतमशापतः ॥ रामेण भ्रमतारण्ये स्वांघ्रिस्पर्शात्स-तद्भूता ॥ २१ ॥ " असे श्लोक आहेत. (आ. रा. सा. का. स. ३) परंतु ह्या उल्लेख कोणीं दुसऱ्यानें केला नाहीं. अर्थात हें मत कोणाला ग्राह्य नाहीं म्हणून त्या संबंधानें येथें विचारही केला नाहीं. ह्या श्लोकानंतर " रामे नौकां कांक्षमाणे नौका पोवाक्यमब्रवीत् ॥ आदावहंक्षालयित्वा पादरेणुंस्तवप्रभो ॥ २४ ॥ पश्चान्नौकां स्पर्शयामितव पादौरघूद्वह ॥ नोचेत्वत्पादरजसा स्पृष्टा नारी भविष्यति ॥ २५ ॥ अस्तिमेगृहिणी गेहे किंकरोम्य परां स्त्रियं ॥........ ॥ २६ ॥

असें लिहिलें. अर्थात मागील विचाराप्रमाणें हेंही वास्तवार्थाला धरून नसल्यामुळें केवळ रोचक आहे असें ठरलें. ×

कित्येकांच्या मतें अहल्योद्धार हें प्रकरण ऐतिहासिक नसून काल्पनिक आहे. कारण वेदांत अहल्या हें नांव उषेचें आहे. व "शक्रः शु शुक्वॉउषोन जारः" "उषोनजारो विभावोस्त्रः" ह्या मंत्रांत इंद्राला उषेचा जार म्हटलें (ऋ. अ. १ सू. ६९ मं. १, ५ ) पण ह्या ठिकाणीं हें लक्षांत ठेवावें कीं, वेदांतील इंद्र व उषा ह्या कांहीं देहधारी व्यक्ति नव्हेत. ह्या नैसर्गिक देवता असून त्यांचें अलंकारिक वर्णन वेदानें केलें. कोणी म्हणतात याच रूपकाचा विस्तार करून वाल्मीकींनीं कथानक रचिलें. हें जर सत्य मानिलें तर गौतमाचा पुत्र

---

×आनंदी रामायण हें अध्यात्म रामायणाच्या पूर्वीं झालें असा कित्येकांचा तर्क आहे. तो खरा धरला तर आनंदी रामायणाचे रोचक विचार अध्यात्मकारानें घेतले असें म्हणावें लागेल. हें कथानक खऱ्या मिथिला नगरीला धरून नाहीं, कदाचित् गौतमाश्रम व मिथिला हे दोन्ही नवीनच कल्पिले असतील तर नकळे. परंतु संकेत रामायणांत हें कथानक वनवास प्रसंगांत वर्णन केलें आहे.

शतानंद हा जनकाचा पुरोहित होता, ह्या ऐतिहासिक गोष्टीची काय वासलात लागेल ? अर्थात अहल्येचा पुत्र शतानंद हा जर ऐतिहासिक धरला तर गौतम व अहल्या ह्याही व्यक्ति ऐतिहासिकच आहेत हें सिद्ध होतें. आतां राहिला इंद्र हा काल्पनिक आहे किंवा ऐतिहासिक आहे याचा विचार करूं.

भरतखंडांत देव, दैत्य, सिद्ध, गंधर्व, विद्याधर, किंपुरुष, पैत्रिक, आर्य, मानव, गुह्यक, राक्षस व पिशाच्च ह्या जातीचे लोक राहात होते असें वामनपुराणांत सांगितलें, त्याच लोकांपैकीं पामीर पाठारावर राहाणारे आर्य आपणास देव म्हणवीत असत, व त्या पामीरलाच स्वर्ग ही संज्ञा होती, असें वायुपुराणावरून समजतें. तेथील राजाला इंद्र हें नांव होतें. येथील व्यवस्था कांहींशी लोकसत्तेसारखी होती, व इंद्राधिकारही कांहीं अटीवर अवलंबून असल्यामुळें त्या अटी इतरांकडून पूर्ण न होतील अशा तऱ्हेची खटपट स्थानापन्न इंद्र करीत असे. म्हणजे कोणी तपश्चर्या करीत असला अथवा शंभर यज्ञाची प्रतिज्ञा करून यज्ञ करीत असला तर तो इंद्रपद घेण्याचीच खटपट करीत आहे अशा शंकेनें तो यज्ञांत अथवा तपांत विघ्न करीत असे. अशा प्रकारच्या उपद्व्यापी स्वभावाप्रमाणें त्यानें गौतमाच्या पुण्यांत उणेपणा पाडण्याकरितां त्याच्या पतिव्रता स्त्रियेला भ्रष्ट केलें. त्याचें तें दुष्ट कृत्य समजण्याबरोबर गौतमानें त्याला वृषणरहित करून पुरुषत्वापासून भ्रष्ट केलें. पुढें तो इंद्र स्वस्थानीं गेल्यावर सिद्ध, गंधर्व, चारण व अग्निप्रभृति देवांना ( सभासदांना ) म्हणाला, " कुर्वतातपसो विघ्नं गौतमस्य महात्मनः ॥ क्रोधमुत्पाद्यहिमयासुरकार्य— मिदंकृतम् ॥ २ ॥ अफलोऽस्मिकृत, स्तेनक्रोधात्साच निराकृता ॥ शापमोक्षण महता तपोऽस्यापहृतंमया ॥ ३ ॥ तन्मांसुरवराःसर्वे सर्षिसंधाः सचारणाः "सुरकार्यकरं यूयं सफलं कर्तुमर्हथ ॥ ४ ॥ " ( वा. रा. १४९ ) अर्थ " महात्मा गौतमाच्या तपामध्यें विघ्न यावें एतदर्थ त्याला क्रोध आणून ( त्याच्या तपाचें फल जी इंद्रपदप्राप्ति ती त्याला न मिळूं देणें ) हें देवकार्य मीं केलें असें नसतें मीं केलें तर त्याच्या उग्र तपानें तो इंद्र होऊन येथें मानवअधिकारी झाले असते व मग तम्हा

देवांना स्थानभ्रष्ट व्हावें लागलें असतें. आतां मीं जें तुम्हांकरितां कृत्य केलें त्याचें फल ( क्रोधामुळें रागारागानें ) त्यानें मला वृषणरहित केलें व तिचा ( अहल्येचा ) ही शापपूर्वक परित्याग केला. अशा रीतीनें त्याला मोठा शाप देण्याला लावून मीं त्याचें तप हरण केलें. तस्मात् ऋषिसमुदाय चारण ह्यांसहवर्तमान सर्व सुरश्रेष्ठ हो, ( माझ्या स्थितीचा विचार करून जेणेंकरून मी देवकार्य करण्यास योग्य होईन अशा रीतीनें मला तुम्ही वृषणयुक्त करा. " हें त्याचें म्हणणें ऐकून देवांनीं पितृगणाला सांगून त्याच्या यज्ञांतील बकऱ्याचें वृषण काढून इंद्रास * लावलें व त्यायोगानें तो इंद्र पूर्ववत् पौरुषयुक्त झाला.

ह्या विवेचनावरून पामीरवरील आर्यांचा राजा इंद्र यानें अहल्येला भ्रष्ट केलें तेव्हां गौतमानें त्याला वृषणरहित केलें व अहल्येस कांहीं नियम सांगून पापक्षालनार्थ तपश्चर्या करावयास लावून स्वत: आश्रम सोडून निघून गेला हें सिद्ध झालें. आतां इंद्रानें अहल्येस भ्रष्ट केलें त्यांत अहल्येचा कांहीं अपराध आहे काय ? तिचा अपराध नसला तर गौतमांनीं तिचा त्याग अन्यायानें केला असें म्हणावें लागेल. व ती अपराधी असेल तर जाणूनबुजून दुराचरण करणाऱ्या स्त्रियेची पातिव्रत्यांत गणती कशी झाली ? इत्यादि प्रश्न उद्भवतात. त्याचा विचार करूं

इंद्रानें गौतमाचें सोंग घेतलें होतें. तरी त्याच्या मूळस्वरूपांत कांहीं बदल झाला होता असें दिसत नाहीं. कारण तो येण्याबरोबर " मुनिवेषं सहस्राक्षं विज्ञाय०....मतिंचकार दुर्मेधा देवराज कुतूहलात् ॥ अथाब्रवीत्सुरश्रेष्ठं कृतार्थेनान्तरात्मना ॥ कृतार्थास्मिसुर श्रेष्ठ गच्छशीघ्रमित प्रभो ॥ २ ॥ " ( वा. रा. १।४८।१९.२० ) असें वाल्मीकींनीं लिहिलें. ह्यांत प्रथमत:च तो इंद्र आहे असें ओळखून त्याच्याशीं रममाण व्हावें असें तिनें मनांत आणलें म्हणूनच वाल्मीकींनीं तिला 'दुर्मेधा' म्हटलें. आणि

* ह्यावरून अति प्राचीन काळीं आर्य लोकांत शस्त्रक्रिया ( सर्जरी ) किती उच्चतेला पोहोंचली होती हें वाचकांच्या लक्षांत येईलच.

समागम झाल्यावरही प्रसन्न अंतःकरणानें ती त्याला म्हणाली, "हे प्रभो, मी आज कृतकृत्य झालें (आतां माझा पति घरीं येण्याची वेळ झाली करितां) तुम्ही सत्वर निघून जा." हें तिचें कृत्य अत्यंत जारिणी स्त्रियेसारखें झालें. म्हणून ती वृंदेची बरोबरी करूं शकत नाहीं. वृंदेला विष्णूनें तिच्या नवऱ्याचें हुबेहूब इतकें बेमालूम रूप घेऊन फसविलें कीं, समागम झाल्यावरही मी परपुरुषाशीं रत झालें असें तिच्या मनांत आलें नाहीं. शेवटीं आपण पातिव्रत्यापासून भ्रष्ट झालों हें तिला समजावें म्हणून रतिप्रसंगांतच तिला आपलें मूळचें चतुर्भुजरूप दाखविलें. पण तें रूप पाहून तिला संतोष वाटणें तर एकीकडेच राहिलें. उलट रागावून तिनें विष्णूस शाप दिला व स्वतः आपला देह जाळून घेतला. म्हणून अशा पतिव्रतेची अहल्या बरोबरी करीत नाहीं असें वर म्हटलें. अशा प्रकारची जरी ती दुष्ट होती तरी गौतमांनीं "तूं दगड हो" असा भयंकर शाप न देतां 'इहवर्ष सहस्राणि बहूनि निवसिष्यसि' "वातभक्षा निराहारा तप्यन्ती भस्मशायिनी ॥ अदृश्या सर्वभूतानामाश्रमेऽस्मिन्वसिण्यसि ॥" असें तिला सांगितलें (वा. रा. १।४८।२९-३०) कारण 'विप्रदुष्टां स्त्रियं भर्ता निरुंध्यादेक वेश्मनि ॥ यत्पुंसः परदारेषु तच्चैनां कारयेद्व्रतम् ॥' १७६ ॥ म्हणजे 'जी स्त्री अत्यंत' दुष्ट असेल (स्वतः पर पुरुषाला बोलावून त्याच्याशीं रत झाली असेल) तर भर्त्यानें (ती कोणाच्या दृष्टीस पडणार नाहीं अशा रीतीनें) एका घरांत कोंडून ठेवावी व परदारागमनाविषयीं पुरुषाला जें प्रायश्चित सांगितलें आहे तेंच प्रायश्चित्त तिच्याकडून करवावें, असें वचन आहे. (म. अ. ११ वा) आणि इतकेंही करून पुनः ती तसलेंच पातक करील तर तिला 'प्राजापत्यकृच्छ्र व चांद्रायण व्रत' करवयास लावून शुद्ध करून घ्यावें असें मनु म्हणतो (म. ॥ १७७) हा प्रसंग तिच्यावर येऊं नये म्हणून 'दाशरथीराम आल्यावर (इंद्राला पाहून जशी तूं मोहित झालीस तशी मोहित न होतां) निष्काम बुद्धीनें त्याचा सत्कार करशील तर आपली पूर्वीची तनु धारण करून माझ्याजवळ येशील. अर्थात् मीं सांगितल्याप्रमाणें आचरण करशील तर तूं पूर्वीप्रमाणेंच शुद्ध आहेस असें समजून मी तुझा स्वीकार करीन। अशा अर्थाचें

भाषण करून गौतम निघून गेले. पुढें विश्वामित्रासह श्रीरामांनीं त्या आश्रमांत प्रवेश केला तेव्हां तेथें निजलेली अहल्या तपानें तेजस्वी दिसली. तेव्हां श्रीरामानें तिला नमस्कार केला. पुरुषाचा स्पर्श होण्याबरोबर ती उठून उभी राहिली व तो अत्यंत सुंदर असलेला पुरुष दाशरथीराम होय हें समजतांच तिनें त्याचा चांगला सत्कार केला व ती पश्चातापपूर्वक पतीच्या आज्ञेप्रमाणें व्रताचरण करीत राहिली त्या अर्थी ती दोषमुक्त झाली असें मानून रामानें तिच्या सत्काराचा स्वीकार केला. आतां दूषित स्त्रियाही पतिव्रता कशा राहातात या विषयीं भारतांतील अहल्येचें उदाहरण सांगून नंतर ही रामायणांतील अहल्या पतिव्रता कशी राहिली हें सांगतों.

अंगीरस कुलामध्यें गौतम नांवाचे ऋषि होऊन गेले. त्याच्या घरीं एक वेळ इंद्र ब्राम्हणाचें सोंग घेऊन अतिथिरूपानें आला. गौतमांनीं त्याचा चांगला सत्कार केला; पण पुढें तो त्याच्या स्त्रियेशीं रत झाला हें पाहून गौतमांनीं आपल्या चिरकारी नावाच्या पुत्रास स्त्रियेचा ( चिरकारीच्या मातेचा ) वध करावयास सांगून स्त्रियेचा त्याग केला. व स्वतः वनांत तपश्चर्या करावयास निघून गेले.

नंतर चिरकारी विचार करूं लागला कीं "पितुराज्ञा कथंकुर्यांनहन्यां मातरंकथं॥ कथंधर्मच्छलेनास्मिन्निमज्जेयमसाधुवत् ॥१०॥ पित्रुराज्ञा परोधर्मः स्वधर्मो मातृरक्षणम् ॥ अस्वतंत्रंच पुत्रत्वं किंनुमांनानुपीडयेत् ॥११॥ स्त्रियंहत्वा मातरंच कोहिजातु सुखी भवेत् ॥ पितरंचाप्यवज्ञाय कःप्रतिष्ठामवाप्नुयात् ॥ १२॥ याप्रमाणें मातापित्याविषयीं विचार करून ज्याअर्थीं स्त्रियेच्या रक्षणाविषयीं सर्वस्वी भार तिच्या पतीवर आहे त्याअर्थीं तिचेकडून दुष्कृत्य घडलें तर "नापराधोस्तिनारीणां नराएवापराध्यति" असा निर्णय करून त्यानें आपल्या मातेचा वध केला नाहीं. पुढें गौतम घरीं आल्यावर त्यांना हें समजलें तेव्हां पश्चात्तापपूर्वक ते म्हणाले ' एवंनस्त्री नचैवाहंनाध्वगस्त्रिदशेश्वरः अपराध्यति धर्मस्य प्रमादस्त्वपराध्यति ' ॥ ५० ॥ असें म्हणून मातेचें रक्षण केल्याबद्दल त्यांनीं पुत्रास शाबासकी देऊन स्त्रियेचा स्वीकार केला ( म. भा. शा. प. अ. २६७ )अर्थात त्यांनीं तिला साध्वी ठरविलें. एकंदरींत ह्या चरि-

त्रावरून व "अदुष्टास्तुस्त्रियो....ह. वं. भ. प.अ. ५ श्लो. ३८ ह्या वचनावरून अहल्या निर्दोषी ठरते, दुसरा जरी तिच्याकडून अपराध झाला तरी त्याबद्दल पश्चात्ताप करून तिनें पतीची आज्ञा अक्षरशः पाळली ह्मणून श्रीरामांनीं ती शुद्ध आहे असें ठरवून तिच्या आतिथ्याचा स्वीकार केला आणि ज्याअर्थी श्रीरामासारख्या थोर पुरुषांनीं ती पवित्र ठरविली तिला आपण अपवित्र म्हणणें हा दोष आहे. कारण पूर्वी असेंच ठरलें होतें. असा विचार करून त्यांनीं तिचा स्वीकार केला.

ह्या चरित्रावरून जे सिद्धांत निघतात ते हे.

१ गौतमांनीं अहल्येस शिळा हो असा शाप दिला नाहीं.

२ श्रीरामानीं दगडाची स्त्री केली नाहीं. तर अहल्येची एकनिष्ठतेनें पतिआज्ञापालनरूप तपश्चर्या पाहून तिचें आतिथ्य स्वीकारून तिला पुनित केलें हाच अहल्योद्धार.

३ अध्यात्मांतील नाविकाचा वृत्तांत अस्थानी असून काल्पनिक आहे.

४ शास्त्राप्रमाणें व पतिआज्ञापालनरूप तपश्चर्येनें अहल्येची गणना पातिव्रत्यांत झाली.

ह्याप्रमाणें अहल्योद्धाराचा हा लहानसा निबंध लिहून सद्गुरुचरणारविंदीं, अर्पण केला.

**स्वामी कृष्णानंद.**
( पूर्वाश्रमीचे कृष्ण जोगेश्वर भीष्म. )
मनोपा, नागपूर.

---

श्रीसाईबाबांनीं कै. लोकमान्य टिळक प्रभृति त्या वेळेचे लहान--थोर हिंदू, मुसलमान, पार्शी, ख्रिस्ती आदि सर्व जातींचे गृहस्थ आपल्या पायांपाशीं आणवून, त्यांना, त्यांच्या स्वमतांना योग्य वळण लावून, पाश्चात्य संस्कृतीच्या निरर्थक मोहजाळापासून परावृत्त करून, इतरांच्या मतांविषयीं जी परस्पर सहिष्णुता व एकी त्यांच्यांत उत्पन्न केली, त्याचें द्योतक म्हणून श्रीलीलेंत अनुभवांना प्रथमतः पूर्ण प्राधान्य देऊन, नंतरच भक्तांनीं पाठविलेले स्फुट लेख प्रसिद्ध करण्यांत येतील. या स्फुट लेखांतील विविधता, विचार व आचार सर्वच संपादकाला संमत असणें संभवनीय नाहीं.

**संपादक.**

श्री साईनाथ प्रसन्न.

# श्री साईलीला

मासिक पुस्तक.

वर्ष ८ वें ] 193 [ अंक ३.

नळिनीदळगत जळमतितरळम् । तद्वज्जीवनमतिशय चपळम्



क्षणमपि सज्जनसंगतिरेका । भवति भवार्णव तरणे नौका
—शंकराचार्य.

संपादकः—रामचंद्र आत्माराम तर्खड.

# अनुक्रमणिका.

पिशाचयोनी ... ... ... ... १—१६
महाराजांचे अनुभव ... ... ... १—८
केकावलि ... ... ... ... ...

# विनंति.

सुप्रसिद्ध श्री मोरोपंत कविकृत **केकावलि** या भक्तिरसप्रेमामृतानें ओथंबलेल्या काव्यावर कै. रा. ब. दादोबा पांडुरंग यांची "यशोदा पांडुरंगी" ही टीका श्री साई लीलेच्या ४—५ अंकापासून क्रमशः प्रसिद्ध करण्यांत येत आहे.

ही टीका सुमारें साठ वर्षांपूर्वी प्रसिद्ध झालेली होती, आणि आजमितीस हा ग्रंथ अत्यंत दुर्मिळ झाला आहे. तरी ग्राहक याचा फायदा घेऊन ऋणी करतील अशी आशा आहे.

व्यवस्थापक—**श्रीसाईलीला**

## श्री साई भक्तांस विज्ञप्ति.

कोणाला श्री साईमहाराजांबद्दलचे त्यांचे स्वतःचे अनुभव श्री साईलीलेंत प्रसिद्ध व्हावे म्हणून पाठविण्याचे असतील त्यांनीं ते आमचेकडे पाठविल्यास ते प्रसिद्ध होण्याबद्दल आदरपूर्वक योग्य तो विचार होईल.

रा. आ. तर्खड

—प्रकाशक

# पिशाचयोनि

स्थूल देहपतनानंतर जें वासनात्मक सूक्ष्म शरीर राहतें त्याचाच एक प्रकार पिशाचयोनि. या सूक्ष्म देहयुक्त योनींतून पुन्हा स्थूल देहधारणप्राप्तीपर्यंतची जी अवधि ती त्या सूक्ष्म देहधारिनाची पुढील स्थूलदेह धारण्यापर्यंतची तयारीची वेळा. ही अवधि त्या सूक्ष्म देहधारिनाच्या वासनांवर सर्वस्वीं अवलंबून आहे. सर्वांची सारखीच वेळा असणें असंभवनीय आहे. **कुवासनायुक्त** सूक्ष्म देहाला बराच वेळ कुचंबावें लागतें. हीच ख्रिस्ती लोकांची Purgatory ( शोकमय ) स्थिति; आपल्या समजुतीप्रमाणें पिशाचयोनि. ज्यांना भक्ति अथवा ज्ञानयोगांच्या उच्च आधारामुळें सद्गुरु माउलीचा पाठिंबा मिळाला आहे, त्यांना ती सद्गुरु माउली मृत्यूनंतर विलंब न लावतां योग्य त्या कुळामध्यें जन्माला घालते. त्याचें त्या जन्मामध्यें लालनपालन करून त्याचा दिवसेंदिवस अध्यात्मिक उत्कर्ष व्हावा यासाठीं सारखी जपत असते. श्री सांईबाबांनीं याप्रमाणें "अनेक जन्म आपुन तुला पाहात आलों" असें आश्वासन देऊन पुष्कळांना त्यांच्या पूर्व जन्मांचे साक्षात् दाखले दिल्याचें प्रसिद्ध आहे.

यासाठीं अंत:काळीं इतर सर्व विचार बाजूला ठेवून त्या कारुणिक प्रभूचें चिंतन केल्यानें योग्य ती गति मिळावी हें साहजिक आहे.

त्यावेळीं मनाची तयारी तशी प्रेमपूर्वक, भक्तियुक्त नसल्यास तो वासनात्मक देह, स्थूल शरीरपतनाच्या यातनांतून मुक्त झाल्यावर, गोंधळांत पडण्याचा पूर्ण संभव आहे, आणि दुसरा स्थूल देह प्राप्त होईपर्यंत त्या सूक्ष्म देहाची चलबिचल झालीच पाहिजे.

याविषयीं आपण एक साधारण दाखला घेऊं. समजा, आपणाला गाढ झोंप लागली आहे अथवा आपले डोळे बंद बांधण्यांत आले आहेत आणि अशा वेळीं अपरिचित अशा दूरवरच्या ठिकाणीं आपणास इच्छेविरुद्ध नेण्यांत आलें, जेथें आपल्या ओळखीचें कोणी नाहीं, तर आपण

स्थिति कशी होईल ? तेंच जर आपण अक्कलहुशारीनें प्रवासाला उद्युक्त झालों तर आपल्याला अडचणींतून पार पडतां येईल कीं नाहीं ? त्यांत सद्गुरु माउलीसारखी मदतगार मंडळी वाटेवर असल्यास तो प्रवास उत्साहपूर्वक पार पडेल कीं नाहीं ?

मानसिक अथवा शारीरिक दुखण्यांमुळें, अथवा ज्याला shell shock (म्हणजे तोफेच्या गोळ्याचा जवळ भयंकर स्फोट झाल्यामुळें) आपण स्वतः कोण होतों याच्या पूर्ण विस्मृतिझालेल्या स्त्रीपुरुषांच्या हालांचे खात्रीपूर्वक दाखले वैद्यकशास्त्रांत आधारपूर्वक प्रतिपादन केलेले आहेत.

याप्रमाणें जर स्थूल देह असतांनाहीं स्वतःची पूर्ण विस्मृति घडत असते, तर त्याच परमप्रिय स्थूल देहाला सोडतांना मृत्युसमयीं ज्या घोर यातना होत असतात त्यांमुळें गोंधळून जाऊन आपण कोण या ज्ञानाच्या अथवा सद्गुरु माउलीचा पाठिंबा नसल्यामुळें तो तामस अहंकाररूपि वासनात्मक लिंगदेह पुनरपि स्थूल देहधारणेसाठीं चांचपडत असल्याकारणानें क्वचित प्रसंगीं सूडरूपि भावनेनें प्रेरित होऊन एखाद्या मानसिक दुर्बल स्थूल देहाच्या कायेमध्यें प्रवेश करण्याची खटपट करीत असल्यास नवल तें कोणतें ?

जर प्रत्येक स्थूलदेही हमेशा मानसिक अथवा शारीरिक दुर्बलतेमुळें ज्याप्रमाणें आपल्या शरीरांत ज्वर, शितळा, पटकी, अशा क्षुद्र दैवरूपि जंतुशक्तींना आपल्या शरीरांत संचार करून त्यांना जास्तीकमती खेळ खेळण्याची पूर्ण मुभा अथवा अवसर देत असतो त्याच प्रमाणें वर वर्णन केलेल्या गोंधळांत पडलेल्या पिशाचरूपि लिंगशारीऱ्याला अशा देहांत अवसर दिल्याचें क्वचित् प्रसंगीं पाहाण्यांत येतें; ज्याला सामान्य जनता झपाटलें अशी संज्ञा देते.

साधारण Hysteria (प्रमादयुक्त वर्तन) हा झपाटल्याचा खरा प्रकार मुळींच नाहीं.

झपाटल्याचे खरे प्रकार अत्यंत विरळा आढळतात. अशा प्रसंगीं तें मनुष्य सावध असतांना त्याला अगम्य अशा भाषेंत बोलत असतें ; न कधीं पाहिलेल्या अशाही स्थलाचें वर्णन करीत असतें.

हें देखील कधींकधीं पूर्वजन्माच्या स्मृतींतल्या आठवणी, ज्या मेंदूच्या विशिष्ट भागांत सांठविलेल्या आहेत आणि ज्या अभ्यासानें योगी आपल्या आकलनांत आणून त्रिकालज्ञान मिळवीत असतो, त्या मेंदूच्या विशिष्ट भागाचें एखादें कपाट त्या वेळेपुरतें आकस्मिक खुलून त्यामुळें ही होत असतें. क्वचित् प्रसंगीं ही आठवण पूर्ण असते. असाच एक प्रकार बिहार प्रांतांत घडल्याचा दाखला गत वर्षीं वर्तमानपत्रांतून प्रसिद्ध झालेला वाचकांच्या अवलोकनांत आला असेलच. या ४—५ वर्षांच्या मुलानें आपण अमूक गांवांत राहात होतों. तेथें आपले गेल्या जन्मांतले मुलगे वगैरे आहेत असें वारंवार सांगितल्यावरून त्याला तेथें नेण्यांत आलें आणि सर्व खुणा पटल्या.

असे प्रकार झपाटल्याचे नव्हेत. त्याचप्रमाणें दुर्बळ मनाच्या मनुष्यावर दुसऱ्या मनुष्यानें Hypnotised ( प्रेरित ) केलेले प्रयोग आणि त्याप्रमाणें त्या बिचाऱ्याचें वर्तन हा देखील झपाटल्याचा खरा प्रकार नाही.

बहुतेक सर्व प्रकार जे आपण पाहातों ते याप्रमाणें Hysteric ( प्रमादयुक्त ) अथवा Hypnotised ( प्रेरित ) असेच असतात. शेवटला प्रकार अत्यंत नीच व त्याज्य आहे.

हाच नीच प्रकार बहुतेक सर्व भोंदु साधु भोळया लोकांना फसविण्यासाठीं योजीत असतात. आणि अशा प्रकारचे फसलेले असंख्य इसम त्यामुळें आपलें ऐहिक आणि पारमार्थिक नुकसान स्वतःकरवीं करवून घेत असतात. असें होत असतांना आपण फसले जात आहोंत याचा त्यांना गंधही नसतो.

अशा प्रकारच्या नीच वृत्तीचीं स्त्रीपुरुषें सर्व देशांत सर्व काळी होतीं, आहेत, आणि होतीलही. अशीं मनुष्यें दुष्ट पिशाचांपेक्षां अनंत पटीनें भयंकर आहेत.

वाटेल तसलें दुष्ट पिशाच प्रभूचें नांव घेतलें असतां तात्काळ वळणीवर येतें; कारण तें सद्गतीच शोधित असतें. परंतु हीं जीवंत मानव देहधारी चालतीं बोलतीं साधुरूपि पिशाचें म्हणजे दुष्टपणाचीं साक्षात् मायावी स्वरूपें आहेत.

माझा परमप्रिय स्नेही अशाच एका Hypnotist ( मानसिक भुरळ घालणाऱ्याच्या ) तावडींत सांपडला होता. परंतु केवळ प्रभुप्राप्ती-साठींच त्याच्या मनाची पूर्ण इच्छा व तळमळ असल्यामुळें इ. स. १९१० च्या सप्टेंबर महिन्यांत श्री सांईबाबांनीं त्याला आपल्याजवळ ओढून घेतलें आणि त्याच्या मनाला योग्य तें अति उत्साहपूर्वक पूर्ण वळण लावलें, ही गोष्ट पुष्कळांना ठाऊक आहे. दुसऱ्या वर्षीं मार्च महिन्यांत जेव्हां तो आपल्या बायकोसह श्रीच्या दर्शनाला गेला तेव्हां त्याच्या बाय-कोला श्रींनीं जे अनेक दाखले देऊन तिच्या मनाचें समाधान केलें, त्याच वेळीं ते म्हणाले " आये ! त्यानें ( त्या Hypnotist नें ) तुझ्या सगळ्या संसाराचें वाटोळें केलें असतें ! पण मी कसं करूं देईन ? " हे श्रीसांई-बाबांचे शब्द लेखक त्या वेळीं तेथें हजर असल्यामुळें आज इतकीं वर्षे झालीं तरी जसे आतांच बोलले असे त्याच्या कानांत गुंगत आहेत. " योगक्षेमं वहाम्यहं " या आश्वासनाप्रमाणें प्रत्यक्ष कृति व प्रेम ठेवून वेडया वांकडया अज्ञानी लेंकुराची चिंता श्री सांई माउलीवांचून दुसरें कोण करील बरें ?

अत्यंत बारकाईनें तपास करतां असें निष्पन्न होतें कीं, हे जे मानसिक व्यथेचे प्रकार आपण पाहातों त्यांत शेकडा ८० ( ऐशीं ) टक्के केवळ Hysteria ( प्रमादाचे ) प्रकार असतात. बाकी राहिलेल्यां-

कीं १५ टक्के Hypnotised चे (प्रेरित) प्रकार असतात आणि बाकीचे ५ टक्के आनुवंशिक व इतर रोगांमुळें असतात.

दुष्ट पिशाचानें हैराण झालेला मनुष्य अत्यंत विरळा. कदाचित दहा लक्ष मानसिक व्यथेंतल्या विकारग्रस्तांमध्यें खरें पिशाचानें झपाटलेलें असें एक तरी मनुष्य सांपडेल याची वानवाच आहे. म्हणून भुताखेतांनीं झपाटलेलें यावर सहसा विश्वास ठेवूं नये. फारच बारकाईनें आणि तज्ञां-कडून तपास करविण्यांत यावा. घाबरण्याचें आपणां हिंदवासियांस कांहीं प्रयोजन नाहीं.

असो ! वरील सर्व विवेचनावरून काय निष्पन्न होतें तें पाहूं या.

१ वासनात्मक सूक्ष्म लिंगदेह धारिन् आहेत.

२ त्यांचें अस्तित्व परलोकाविषयीं साक्षात् दाखला देत आहे.

३ त्यांमध्यें मार्ग चुकलेलीं गोंधळांत पडलेलीं अशी पिशाच-योनि आहे.

४ अशांचें क्वचित् प्रसंगीं दर्शन झाल्यास घाबरून जाण्याचें कांहीं प्रयोजन नाहीं. तीं परमेश्वराचीं दीन, गोंधळलेलीं आपणाप्रमाणेंच लेंकरें आहेत. "आपल्याला कांहीं एक करणार नाहींत. भुतेंखेतें आपल्या वाटेस जाणार नाहींत." या श्री साईबाबांच्या पूर्ण आश्वासनावर भरंवसा ठेवून, श्रीसाईबाबांसारख्या दिव्य पुरुषाला अथवा ज्याच्या त्याच्या मनो-भूमिकेप्रमाणें त्या कारुणिक परमेश्वराला हांक मारली असतां तें पिशाच कांहींही करूं शकणार नाहीं हें पक्कें लक्षांत ठेवावें. भीति मुळींच ठेवूं नये.

५ क्वचित् प्रसंगीं आणि ही गोष्ट अगदीं अगदीं विरळा असते. त्यांतील कांहीं सूक्ष्म देहधारिन् दुबळ्या मनाच्या मनुष्यांच्या शरीरांत

संचार करून छळूं शकतात. आणि त्यांची सुटका श्री साईबाबासारखे दिव्यदेही सहज करूं शकतात.

तांत्रिक मांत्रिक अथवा पंचाक्षरी यांच्यावर कधींही विश्वास ठेवूं नये, कारण अशा लोकांना याविषयींची यत्किंचितही माहिती नसते. आणि उलट ते जास्ती बिघाड करीत असतात.

६ हे मांत्रिक ढोंगी साधूंच्या मालिकेंतले समजावे. त्यांतले कांहीं Hypnotist ही असतात, आणि आपल्या मनांत योजिलेले शब्द व कृति त्यांच्या समोरच्या दुबळ्या शारीऱ्याच्या मनावर उठवून भोळ्या लोकांना ते चकवीत असतात. म्हणून अत्यंत हुषारी ठेवावी.

६ यासाठीं अशा भोंदूंच्या फशीं न पडतां श्रीराम, श्रीकृष्ण अशा अवतारी पुरुषांच्या अथवा ज्याच्या त्याच्या मनोभूमिकेप्रमाणें अल्लाह, गॉड, वगैरे त्या कारुणिक प्रभूच्या नांवानें त्याला आळविलें असतां योग्य तो मार्ग श्रीसाईबाबांसारख्या दिव्य व्यक्तीद्वारें, **अथवा त्यांच्या आश्चर्य-कारक उदीच्या प्रभावानें** तो दाखवितोच दाखवितो.

७ वरील प्रकारच्या संकटांत जवळ उदी नसल्यास प्रेमयुक्त अंतः-करणानें आपल्या या अति पवित्र हिंदरूपि दिव्य मातेचें धुलिवंदन अथवा जलसिंचन ती धुळी अथवा तें जल भाल प्रदेशीं लावलें असतां तोच आश्चर्यकारक परिणाम घडतो,

या धुलीवंदनासंबंधानें शास्त्राधार असलेच पाहिजेत; आणि त्या विषयीं आधारयुक्त विवेचन आल्यास श्री लीलेचे संपादक आनंदानें तें प्रसिद्ध करतील अशी खातरी आहे.

**वंदे मातरम्** या मंत्राचा कृतिपूर्वक उच्चार व आचार होऊन त्याप्रमाणें करणाऱ्या प्रत्येक आबालवृद्ध स्त्रीपुरुषादि भारतवासियांची स्वतःच्या आत्मविश्वासाच्या विकासासाठीं विशेष स्फूर्तिदायक प्रगति

होईल यांत संशय नाहीं. आणि त्यामुळें प्रत्येक हिंद पुत्राला भूतबाधादि क्षुद्र प्रकार कधीहीं व्हावयाचे नाहीं तर नाहीं; परंतु तो इतरांना पूर्ण आत्मबलयुक्त करण्यांला सामर्थ्यवान होऊन आपल्या हिंद मातेचीं आदर्शरूप बालकें होण्याला तयार करील.

वंदे मातरम् या मंत्राचा पवित्र गायत्री मंत्रांत समावेश होतच आहे; परंतु तितकें तपासतो कोण ?

या विषयाचा समारोप करतांना हा अज्ञानी लेखक या अनंत कोटि ब्रह्मांडनायकाच्या प्रचंड शक्तीचें रूप इतर ठिकाणीं बाहेर न पाहता या आपल्या पवित्र भारत भूमध्येंच विशेष पाहत आला आहे.

श्रीकृष्ण भगवंतानें ज्याप्रमाणें आपलें विश्वरूप दाखवून आपल्य परमप्रिय भक्त अर्जुनाला गोंधळवून टाकलें, त्याप्रमाणें श्री जगन्नायकाच्या विश्वरूपि लीला पाहून विनाकारण दिग्मूढ न होतां, या आपल्या श्री भारत भूच्याचं लीला लेखकाला अति रम्य, मान्य व गोड वाटत आल्या आहेत.

या भारतमातेच्या पृष्ठावर अनेक ब्रह्मवेत्ते व दिव्य व्यक्ति निर्माण झालेल्या आहेत, त्यांच्या मुखांतून अनेक बोधामृतें निघालेलीं आहेत. त्या बोधामृतांमुळें त्या निरुपम प्रभूला उपमा, निर्गुणाला गुण, अरूपाला रूप, अगम्याला गम्य अशीं स्वरूपें अनेक संतांनीं साक्षात् अनुभवांत आणून त्याकरवीं स्वतःला आत्मसाक्षात्कारी करून घेतलें आहे.

या अनेक संतांनीं या पुण्य भूमीच्या वातावरणांत आपल्या अवर्णनीय स्थूल देहांमार्फत—

**आकाश तत्वांतून** आपल्या अप्रतिम विचारांची जगाच्या अंतापर्यंत चलना दिली आहे.

**वायु तत्वांतून** आपल्या वाणीनें सर्व व्योम हालवून सोडलें आहे.

**तेज तत्वामार्फत** अनेक साधकांना आत्मसाक्षात्कार करवून घेण्याचें सुलभ केलेलें आहे.

**जल तत्वांतून** सर्व नद्या, नाले, समुद्रादिकांचीं पुण्य तीर्थें बनविलीं आहेत.

**पृथ्वी तत्वांतून** आपल्या संचारानें व पादस्पर्शानें प्रत्येक रजःकणाला श्रीईशावास्योपनिषपदाच्या आधाराप्रमाणें सर्वशक्तिमान प्रभूचें पूर्णशक्तित्व आलेलें आहे हें निर्विवाद केलें.

असें असल्यामुळें प्रत्येक भारतवासियाचें अंतःकरण या पुण्य धुलीवंदनामुळें पूर्णपणें उचंबळून या आपल्या श्री भारतमातेच्या, श्री हिंद देवीच्या, साक्षात् श्री भवानीच्या पूर्ण स्वरूपाचा संचार त्याच्या हृदयांत **वंदे मातरम्** हा मंत्र सक्रिय म्हणतां झालाच पाहिजे.

श्री सद्गुरु सांई माउलीच्या पायांपाशीं प्रभु कृपेनें ज्या त्यांच्या अलौकिक लीला प्रत्यक्ष पाहाण्यांत आल्या त्यांवरून सुचलेले विचार हें त्यांचें अज्ञानी लेंकरूं त्यांच्याच चरणीं अत्यंत विनम्र भावानें अर्पण करीत आहे.

**" म्हातारा "**

# महाराजांचे अनुभव

## ॥ श्री साईनाथ प्रसन्न ॥

सन १९१३ सालीं माझे स्नेही श्री. गजानन महादेव कुळकर्णी ह्यांच्या आग्रहावरून माझें शिर्डीस जाणें प्रथमच झालें. त्या वेळीं मी अॅक्टिंग तलाठी होतों स्थिति गरिबीची होती व अद्यापही आहे; परंतु मला महाराजांसारखी अत्यंत सांगड मिळाल्यामुळें सांप्रतच्या संसारसौख्याकडे (पाण्याच्या बुडबुड्याप्रमाणें) कितपत मी सौख्य मानून राहावें ह्याचा विचार फक्त श्री सांईभक्तांसच अगर संतसमागम असणाऱ्यांसच करतां येईल.

१ ला अनुभवः—वरील सनापासून तों आज तागायत त्यांचे दर गुरुवारीं आरतीचे क्रम त्यांच्या कृपेनें सुरू आहेत; परंतु मी अद्याप सरकार नोकरींत तलाठ्याच्या जागीं असल्यामुळें कदाचित् कांहीं गुरुवारीं प्रत्यक्ष त्यांनीं दिलेल्या पादुकांचें पूजन करून आरती करणें हा योग चुकत असतो, त्यास नाइलाज आहे.

२ रा अनुभवः—माझे स्नेही रा.रा.लक्ष्मणराव खरे ह्यांच्या गड्याच्या ८-९ वर्षांच्या मुलास चूड नांवाचें विषारी जनावर चावलें. त्या वेळीं वरील गृहस्थ रात्रौ सुमारें ८।-८॥ वाजतां माझ्या घरीं येऊन म्हणाले कीं, "तुझ्या जवळ औषध आहे काय ? असल्यास दे" त्या वेळीं मी जेवावयास बसलों होतों. माझ्या कुटुंबास मी देवांत असलेली उदी बाबांचें नांव घेऊन त्यांना दे, असें सांगितलें. त्याप्रमाणें त्यांनीं उदी घेऊन आपल्या गड्यास दिली व गड्यानें पोटांत पाण्याबरोबर मुलास दिली. उदी पोटांत जातांक्षणींच मुलास झोंप लागून जनावराचें विष उतरलें असें सकाळीं तपास करितां समजलें. ह्यावरून मृत्युमुखीं गिळलेला प्राणी बाबांच्या उदीनें परत आला. हा उदीचा प्रभाव आहे हें सांईभक्तांसच मात्र कळून येईल, यांत शंका नाहीं.

मला बरेच वेळां असे उदीचे प्रसंग आले व त्यायोगें बाबांच्या उदीनें गुण आला, त्याबद्दल मी बाबांचा जन्मोजन्मीं ऋणी आहें.

३ रा अनुभव:—माझा मुलगा विश्वनाथ वय ९ वर्षांचें. साल " साली सुमारें १ फूट उंचीवरून दगडावर पडला. पडल्याबरोबर तो येवढेंच म्हणाला कीं, मला थंडी आली. त्या वेळीं मलेरियाचा ताप असावा असें समजून आम्ही मुलास अंगावर घालून तसेंच निजविलें. मुलगा स्वस्थ झोंपला आहे या सबबीवर आमच्या कुटुंबानें अगर मी कांहीं त्याला पाहिलें नाहीं. रात्रौ सात वाजतां मुलगा कां उठत नाहीं त्या वेळीं पाहातों तों मुलगा बेशुद्धींत. त्या वेळीं डाक्टर बोलाविला. "मुलास वात झालेला, मुलाची स्थिति बरोबर नाहीं," असें माझ्या कांहीं मित्रांस डॉक्टरनें सुचविलें. एक डॉक्टर घाबरून घरीं बोलाविलें असतां येण्यांत अर्थ नाहीं असें त्यानें कळविलें; परंतु ज्यास श्रीबाबा डॉक्टर आहेत त्यांच्यापुढें इतर मनुष्यरूपि डॉक्टर कसे असणार ! असो ! सरकारी डॉक्टर मात्र औषध देत होता ! अखेर मुलाचा पुढील विधि होणार असें समजून ज्ञाती गृहस्थ जमले. इतक्यांत एक स्नेही म्हणाले, घाबरूं नका. मुलाला जीव आहे. इतक्यांत माझी मेहुणी गंगारूपबाई हिनें उदी चमच्यानें तोंड उघडून तोंडांत घातली. ती पोटांत गेली किंवा नाहीं याची शंकाच ! झालें ! मुलगा ३ दिवस शुद्धींत नव्हता तो साधारण पाहूं लागला. प्रथम बाबांच्या तसबिरीकडे पाहून ताकद नसल्यामुळें हलक्या हातानें नमस्कार तसबिरीस केला. नंतर माझी मेहुणी गंगारूपबाई हिला नमस्कार केला व नंतर सर्वत्रांस केला. मुलगा मृत्युच्या मुखांत पडलेला बाबांनीं परत दिला ह्यांत शंका नाहीं. हा उदीचा पराक्रम. श्री बाबांची लीला अगाध आहे. ती किती आहे हें मात्र सांईभक्तांसच कळेल, ह्यांत संशय नाहीं.

बरेच दिवस अनुभव द्यावा असें मनांत होतें; परंतु लोकापवादास्तव मनांत शंकेचें काहूर झाल्यामुळें दिला नाहीं. आतां मात्र अंक ( वर्ष ६ वें

११-१२ ) वाचतांना अनुभव द्यावा अशी प्रेरणा श्री जगतपाल श्री बाबा ह्यांनीं दिल्यामुळें देत आहें. आपणांस पसंत पडल्यास सांई लीलेच्या अंकांत प्रसिद्ध करावा.

तसेंच श्री सांई बाबांनीं परवानगी दिल्यास मला पडत असलेल्या स्वप्नाचें निरसन श्री परम सांईभक्त कै. दाभोळकर ह्यांच्याच तोंडून कसें सुचविलें ह्याबद्दल थोडें विवेचन करीन.

आपला नम्र,

**ल. म. प्रधान**

ता. २९-१२-३०. तलाठी, शाहापूर, जि. ठाणें.

## श्रीसच्चिदानंद सद्गुरु साईबाबा प्रसन्न.

श्रीयुत रा. रा. बाबासाहेब तर्खड यांस कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती विशेष. आपल्या श्री साईलीलेच्या मासिकांत माझ्या अल्प बुद्धीच्या श्री बाबांच्या दासाचे अनुभव प्रसिद्ध व्हावे असें श्री सद्गुरु माउलीच्या इच्छेवरून प्रेरणा झाल्यामुळें आपणाकडे अगदीं थोडेच अनुभव प्रसिद्ध करण्याकरितां पाठवीत आहे. तरी त्यांतून जे आपणास छापण्यास योग्य वाटतील ते घ्यावे अशी विनंती आहे.

मजला श्री सद्गुरु साईनाथांच्या लीलेचे अनेक अनुभव आले आहेत व हरघडी येत आहेत. श्री बाबांच्या सामर्थ्याचें वर्णन करणें माझ्या पामराच्या शक्तीच्या बाहेर आहे, तरी पण खालील अनुभव त्यांच्याच प्रपेर्नें देण्याचें धाडस करीत आहें. श्री बाबांचा अवतार माझ्यासारख्या पामरांचा उद्धार करण्याकरितां झाला असावा हें खास.

१. मजला सन १९१२ सालीं श्री सद्गुरु माऊली बाबांच्या दर्शनाचा योग आला. त्यानंतर श्रीबाबा समाधिस्थ होईपर्यंत पुन्हां दर्शनाचा योग आला नाहीं, तरी पण श्रीनीं माझें चित्त आपल्या चरणकमलाकडे ओढून घेतले. मी बाम्बे पोर्टट्रस्टमध्यें नोकरीस आहे. निर्गत मालांचीं बिलें तपासून कस्टमस् ऑफिसला रेकॉर्ड करण्याकरितां पाठवावयाचीं असतात, तें काम कांहीं दिवस मी करीत असे. एके दिवशीं नेहमींप्रमाणें बिलें तपासून कस्टम् ऑफिसला रेकॉर्ड करण्याकरितां पाठविलीं. तेथील रेकॉर्ड क्लार्कनें कांहीं बिलें आमच्या रेकॉर्डला नकोत अशी चिठ्ठी लिहून परत पाठविली व तीं आमच्या रेकॉर्डला ठेविलीं. पुढें दोन महिन्यांनीं कस्टमसूच्या असिस्टंट कलेक्टरनें अमुक अमुक नंबरचीं बिलें आमच्या रेकॉर्डला पाठविलीं नाहींत, तरी तीं पाठवून द्यावीं असें आमच्या ऑफिसला पत्र लिहिलें. आमच्या ऑफिसरानें तें पत्र पाहातांच रागानें मला न बोलावितां दुसऱ्या एका खिश्चन क्लार्कला बोलाविलें व अतिशय दम दिला. तो खोलींतून बाहेर आल्यानंतर पाहातों तों त्याचा त्या पत्राशीं कांहीं संबंध नसून मी करीत असलेल्या बिलांसंबंधानें आहे. मी नवीनच त्या ऑफिसमध्यें लागलों होतों;त्यामुळें घाबरलों. घरीं गेल्यानंतर कांहीं सुचेना. श्रीसद्गुरु माउलीचा धांवा चालविला. दुसऱ्या दिवशीं सकाळीं ऑफिसमध्यें लौकर गेलों. मी आणि रेकॉर्डचा शिपाई मिळून दोघांनीं सर्व रेकॉर्ड शोधलें; परंतु त्या नंबराचीं बिलें मिळेनात. आमचे साहेब त्या दिवशीं विचारण्यास विसरले. परंतु मजला फार काळजी वाटू लागली व रात्रीं कांहीं सुचेनासें झालें, व एकसारखा श्री बाबांचा धांवा चालविला. दुसऱ्या दिवशीं सकाळीं पुन्हां लौकरच ऑफिसमध्यें गेलों, व जातांक्षणींच रेकॉर्डच्या खोलीमध्यें गेलों. रेकॉर्डच्या खोलींत टेबल होतें त्यावर त्या बिलांचें बंडल चिठ्ठीसह असलेलें मिळालें. हें या ठिकाणीं कोणी आणून ठेविलें याचा तपास कांहीं लागला नाहीं; तेव्हां मी मनांत समजलों कीं, ही समर्थांची लीला असावी हें खास.

२. सन १९२३ सालांत मजवर एक मोठें संकट आलें. तें संकट येण्यापूर्वीं आमच्या घरीं गुरुवारीं दोन प्रहरच्या १२ च्या सुमारास एक विभूति आली, व ओटीवर खांबाला टेंकून बसली. ती विभूति शरीरानें फार उंच व मजबूत होती. मुलें ओटीवर खेळत होतीं, तीं बोवा आला बोवा आला असें ओरडूं लागलीं. तेव्हां माझ्या वडील बंधूंचें कुटुंब व माझें कुटुंब पाहाण्याकरितां ओटीवर आलीं. त्यांना पाहातांच ही विभूति खालीलप्रमाणें बोलूं लागली. बाई, तुम्ही भिऊं नका. मी कोणी भोंदू साधू नसून गाणगापुराहून आलों आहे. तुमच्यावर एक मोठें संकट येणार आहे, व त्या संकटांतून आजपासून एक महिन्यानें मुक्त व्हाल, व त्याअंतीं तुमचा लौकीक वाढेल. तुम्ही घाबरून जाऊं नका, व दुसऱ्या कांहीं गोष्टी सांगून ही विभूति जाऊं लागली, तेव्हां माझ्या कुटुंबानें आपणांस काय पाहिजे म्हणून विचारलें. मला कांहीं नको; फक्त डोक्याला बांधण्याकरितां एक फडकें द्यावे व नंतर ती विभूति कोठे गेली. हा सर्व प्रकार मी ऑफिसांत असतांना घडला. घरीं आल्यानंतर ही सर्व हकीकत मला समजली नंतर ३-४ दिवसांच्या आंतच माझ्यावर संकट आलें व श्रींनीं सांगितल्याप्रमाणें सर्व गोष्टी घडल्या. नंतर माझी खात्री झाली कीं, ज्याअर्थीं डोक्याला बांधण्याकरितां फडकें मागितलें त्याअर्थीं ही विभूति दुसरी कोणी नसून श्री सद्गुरु साईनाथ माऊलीच असावी. मजला दर्शन न झाल्यामुळें अतिशय वाईट वाटलें.

३. वर सांगितलेल्या संकटाचा निकाल लागल्यानंतर मी सन १९२३ सालीं गुरु पौर्णिमेच्या उत्सवाला शिर्डीस गेलों होतों; तेव्हां हल्लीं मशिदींत असलेली श्री बाबांची अति मोहक तसबीर पाहिली व तिची नक्कल घेण्याची मजला ईच्छा झाली; परंतु त्या वेळीं सगुणच्या येथें तसली तसबीर मिळाली नाहीं. पुढें लौकरच सन १९२४ सालीं माघ महिन्यांत आमच्या घरचीं सर्व मंडळी वडील बंधूंचे जांवाई, व्याही वगैरे सर्व

२५-३० मंडळी शिर्डीस श्री समर्थांचें दर्शन घेऊन नंतर श्रीक्षेत्र पंढरपूर येथें जाण्याकरितां निघाली. मला रजेची सवड नसल्यामुळें फक्त एकटयाला घरीं राहाणें भाग पडलें. बोरीबंदर स्टेशनवर मंडळीला गाडींत बसविण्याकरितां आलों. सर्व मंडळी गाडींत बसली. सर्व मंडळीबरोबर श्री बाबांच्या दर्शनाचा लाभ होत असतां नोकरीच्या गुलामगिरीमुळें जातां येत नाहीं म्हणून अत्यंत वाईट वाटलें. मी मंडळींना श्रीक्षेत्र पंढरपूर येथें भेटतों असें सांगितलें. माझ्या कुटुंबास मशिदींत असलेल्या श्री बाबांच्या तसबिरीची नक्कल घेण्यास सांगितलें. नंतर ठरल्याप्रमाणें मी ४।५ दिवसांनीं पंढरपुरास गेलों. तेथें आम्हां सर्वांची भेट झाली. नंतर दुसऱ्या दिवशीं दोन प्रहरीं माझें कुटुंब, पुतणी, मी अशीं तिघें असतांना श्री बाबांच्या फोटोविषयीं चौकशी केली. त्या वेळीं माझ्या पुतणीनें श्री बाबांची मशिदींत असलेली रंगीत तसबिरीची लहान साईजची परंतु हुबेहुब तशीच रंगीत तसबीर दाखविली. तसबीर पाहि-ल्यानंतर मला फार आनंद झाला. व श्री बाबांचें दर्शन झालें असें वाटलें. माझ्या कुटुंबाला तसली तसबीर मिळाली नव्हती, म्हणून थोडा रागावलों. पुतणीनें दाखविलेली तसबीर आम्हीं तिघांनीं पाहिली; अंधेरीस घरीं आल्यानंतर दुसऱ्या दिवशीं पुतणीनें तसबीर पाहिली. तेव्हां ती तसबीर रंगीत नसून साधी होती. तिनें तसबीर घेतांना ती साधीच होती याचें तिला विस्मरण झालें व ती रंगीत तसबीर शोधूं लागली. मी ऑफिसांत गेलों होतों. तसबीर सांपडली नाहीं तेव्हां तिला वाटलें कीं, मीं कदाचित् ठेविली असेल. ऑफिसांतून घरीं गेल्यानंतर पंढरपुराला दाखविलेली तसबीर तुम्हांजवळ आहे काय ? असें पुतणीनें मला विचारिलें. मी उत्तर दिलें नाहीं. तसबीर तुझ्या ट्रंकांत तूं ठेविलीस. ती म्हणाली ती तसबीर नाहीं. कोठें गेली. तेव्हां मी विचारिलें तुम्ही तसल्या तसबीरी किती आणिल्या. ती म्हणाली मी एक व धाकटया बहिणीनें एक मिळून दोन. तुझी तसबीर तुझ्याजवळ आहे काय ? ती म्हणाली होय. दुसरी तसबीर तुझ्या धाकटया

बहिणीजवळ आहे काय ? तो तपास कर. त्याप्रमाणें तिनें घेतलेली तसबीर तिच्याजवळ होती. म्हणजे दोन्हीं तसबीरी आहेत. तसबीर कांहीं गेली नाहीं. फक्त ती रंगीत पंढरपुरांत पाहिली तशी नाहीं तेव्हां मी म्हणालो कीं श्री बाबानें मजला पंढरपुरांत त्या तसबिरीच्या रुपानें दर्शन दिलें. काय श्रीसमर्थांची लीला !

४. सन नक्की जरी लक्षांत नाहीं, तरी बहुतकरून सन १९२४ साल असावें. आमच्या घरीं गणेश चतुर्थीच्या दिवशीं श्री गणपती येत असतो व तो दीड दिवस असतो. माझ्या वडील बंधूंची चार वर्षांची मुलगी बरेच दिवस आजारी होती. डॉक्टरचें औषध चालू होतें. भाद्रपद शुद्ध ५ म्हणजे ज्या दिवशीं दीड दिवसाचे श्री मोरया जावयाचे त्या दिवशीं तिची प्रकृति अत्यावस्था झाली. ताप फार चढला व तिला शुद्धी वगैरे नव्हती. नावड-तोब डॉक्टरला बोलाविलें. डॉक्टरनें तब्बेत पाहून सांगितलें कीं, ती आतां कांहीं फार वेळ काढित नाहीं. १।२ तास फार तर काढील. हें ऐकून आम्ही सर्व मंडळी फार काळजींत पडलों. घरांत श्री मंगल मूर्तीची स्थापना झालेली व त्या दिवशीं श्री मोरया जावयाचे होते. नंतर श्री मंगल मूर्तीची व श्री सद्गुरु माऊली साइनाथांची प्रार्थना केली व उदी दिली. उदी दिल्यानंतर थोडा थोडा तिला आराम पडत चालला. उदीच देण्याचें पुढें चालू ठेविलें व तीन दिवसांनीं तिची तब्बेत हुशार झाली. हा केवळ उदी माऊलीचा प्रभाव.

५. माझे स्नेही रा. रा. वामन भिकाजी प्रधान, यांच्या कुटुंबास कांहीं दिवस गेले होते. म्हणजे जवळ जवळ सात महिने झाले होते. एके दिवशीं एकाएकीं गर्भ स्थीर होऊन त्यांच्या पत्नीला असह्य वेदना होऊं लागल्या. त्या दिवशीं ते ऑफिसांत आले नाहींत व दुसऱ्या दिवशीं आले. त्यांना आदल्या दिवशीं ऑफिसांत न येण्याचें कारण विचारितां त्यांनीं वरील हकीकत सांगितली. दुसऱ्या दिवशीं त्यांना श्री सद्गुरुमाउलीचा

उदीप्रसाद आणून दिला. त्यांनीं संध्याकाळीं घरीं गेल्यानंतर कुटुंबास उदी दिली.उदी दिल्यानंतर अर्ध्या तासाच्या आंत दुखणें बंद झालें व नेहमींपेक्षां जास्त हुशारी वाटूं लागली. दुसऱ्या दिवशीं ऑफिसांत आल्यानंतर मी काय दिलें ते त्यांनीं मजला विचारिलें. श्री सद्गुरु साईबाबांची उदी होती. दुसरें कांहींएक नाहीं, असें मी सांगितलें. ते पूर्वीं कधीं शिर्डीस गेले नव्हते. नंतर ते लौकरच सर्व मुलांमाणसांना घेऊन श्री बाबांच्या दर्शना-करितां शिर्डीस गेले. तेव्हांपासून ते श्री बाबांची सेवा करीत आहेत. ही हकीकत सन १९२४ सालांत घडली.

श्री साईबाबांच्या लीला अनंत व अतर्क्य आहेत. त्यांचें मीं कोठवर वर्णन करूं.

तींत अलंकार, लोकव्यवहार आणि यमक, इतकें सर्व सरस रीतीनें साधण्याचें चातुर्य कसें प्रकट केलें आहे. यापेक्षांही दशगुणित त्यांचें कवनकृतीचें चातुर्य त्यांच्या रचलेल्या साऱ्या भारतांत व रामायणांत जागोजाग जे कोणी त्यांच्या सर्व कृतीचें लक्षपूर्वक पर्यालोचन करितील, त्यांच्या प्रचीतीस आल्यावांचून राहाणार नाहीं, असा माझा दृढ निश्चय आहे. सहज बोलत असतां मोरोपंतांच्या मुखांतून सरस आर्या निघाव्या, आणि मोठेमोठे प्रास आणि यमकें सहज त्यांनीं साधावीं, इतकी परमाश्चर्यकारक कवन करण्याची हातोटी त्यांस साधून गेली होती असें त्यांच्या कृतीच्या अवलोकनावरून सहज माझें अनुमान होतें. हे कवि रामोपासक असल्यानें आपल्या इष्ट देवतेचें चरित्र एक्याचप्रकारें वर्णावें हें कार्य यांच्या विशाल बुद्धीस फारच अल्प असें वाटून तितक्यांत तो तृप्त झाली नाहीं. तिनें आपलें वैचित्र्य त्याच चरित्राच्या विचित्र रचनेंत प्रकट केलें आहे; त्याचा उगीच नमुना खालीं दाखवितों.

## मंत्र रामायण.

| | |
|---|---|
| अजितप्रभुविधिवचनें | त्रिजगत्पीडकदशास्यमाराया । |
| होयचतुर्मूर्तिधर | श्रीदशरथपुत्रभक्ततारा॒या ॥ १ ॥ |
| आदिपुरुषदेवधरीं | जींतातेंसविधिठेविलींनामें । |
| तींरामभरतलक्ष्मण | शत्रुघ्नअशींसुखधिंचींधामें ॥ २ ॥ |
| इष्टयर्थगाधिसुतनें | अस्त्रेंशतदेमखघ्नअरिखपर्वा |
| पावेस्वपराभवकर- | राक्षसनाशेंउदंडहरिखपर्वा ॥ ३ ॥ |
| ईश्वरमुनिभार्येतें | चरणरजेंउद्धरीकरीधन्या । |
| हरधनुचुरिजनकाच्या | कौशिकचवघांसिदेववीकन्या ॥ ४ ॥ |

यांत अपासून ज्ञपर्यंत सर्व वर्ण अनुक्रमें आर्येच्या आरंभीं आणून आर्या रचिल्या आहेत.

## नामांक रामायण

| | |
|---|---|
| राजीवोद्भवविनर्वा | विश्वाऽहितदशमुखासिमाराया । |
| मधुकैठभारिदशरथ- | सुतहोयत्रिभुवनासिताराया ॥ १ ॥ |
| रामप्रभुकौसल्या- | सुतकैकेयीकुमारतोभरत । |
| महितगुणसुमित्रात्मज | लक्ष्मणशत्रुघ्नकीर्तिलोभरत ॥ २ ॥ |
| राजासिरामलक्ष्मण | गाधिजमागेस्वयागरक्षाया । |
| मनुदगुजेंरुनिदेशें | देप्रियहीप्रणतभद्रदक्षाया ॥ ३ ॥ |

यांत एकएका आर्येच्या पहिल्या आणि तिसऱ्या चरणांच्या आरंभीं रामनामांतील रा आणि म हीं अक्षरें अनुक्रमें आणून सर्व आर्या रचिल्या आहेत. याचप्रमाणें उमा–रामायण रचलें आहे.

## परंतु रामायण

श्रीरामचरितकरितें मुक्तसक्तत्किमपिसेवितांभावें ।
पारनलागेदशशत- वदनांहिपरंतुवाटतेंगावें ॥ १ ॥
संकल्पेंचिसुरद्विज- पीडकरक्षःक्षयेंस्वभजनरसा ।
देतोपरंतुझाला दशरथभक्तप्रियार्थअजनरसा ॥ २ ॥
एकेचिमूर्तिनेंप्रभु करितात्रैलोक्यकामनापूर्ती ।
क्रीडार्थपरंतुधरी चारत्रिजगन्मनोहरामूर्ति ॥ ३ ॥
तेरामभरतलक्ष्मण शत्रुघ्नकुमारसारसाक्षजना ।
दिसतीबाळपरंतु स्वगुणांहींहरितिगुरुमुनींद्रमना ॥ ४ ॥

यांत अर्थ सरस ठेवून प्रत्येक आर्येत परंतु हा शब्द प्रविष्ट केला आहे. अशा सर्व मिळून २४० आर्या या रामायणांत आहेत.

## ती[१] रामायण

श्रीपतिपुष्करलवशिव विश्वाघायादशाननवधानें ।
नरहोयतवशींभव- धानेंमिळतेंनतेंअनवधानें ॥ १ ॥
सत्यव्रतदशरथनृप जोअर्थिद्विजमयूरघनयास ।
स्वगुरुवदेजगद्गुरु सुमतिसशतमखसखाससनयास ॥ २ ॥
गंभीरकृतसुरतरु- क्रीडमनुजकौतुकीतनुजचार ।
तेरामभरतलक्ष्मण शत्रुघ्नकुमाररुचिरसुविचार ॥ ३ ॥
कौशिकयागोपद्रव मथुनिपथींताटकाहरीराम ।
तीर्थांघ्रिगौतमाच्या स्त्रीलावारूनिशापदेधाम ॥ ४ ॥

यांत श्री पुष्कर, सरयू, गंडकी, गोमती, इत्यादि प्रसिद्ध तीर्थांचीं नांवें प्रत्येक आर्येत साधतील अशा अक्षरांनीं घटित शब्दांची योजना करून सर्व आर्या ६० रचिल्या आहेत. त्याचप्रमाणें प्रसिद्ध ऋषींचीं नामें येतील अशा आणखी ६९ आर्या रचून ऋषि–रामायण केलें आहे.

याच प्रमाणें विष्णुसहस्रनामांत जितकीं विष्णूचीं नामें आहेत त्यांतून दर स्तोत्रांत १०० नामें साधून १० स्तोत्रें करून स्तोत्र रामायण रचिलें आहे. आपला

अर्थ राहून विष्णूचीं सहस्रनामें साधून रामायणाची कथा रचणें हें काम केवढें चातुर्याचें याचा सूज्ञांनीं विचार करावा.

## लघु रामायण

| | |
|---|---|
| दशमुखवधमतिविधिसुर- | नुतपदजगदधिपअजितवरदहरि । |
| परमकरुणम्हणवुनिदश- | रथनरवरतनुजमनुजपणहिधिरि ॥ १ ॥ |
| कुशिकतनयसवसमवन | करिमुनिवरयुवतिदुरितगिरिसखणि । |
| मगपुरहरधनुचुरिवरि | अवनिजनिससकळसुभटमुकुटमणि ॥ २ ॥ |
| जनकनिजदुहितृपतिकरि | दशरथसुतसकळपरममहकरुनि । |
| पुरवहुसुखधिपरशुधर | खररुडनळप्रहितभुजजभयहरुनि ॥ ३ ॥ |

यांत सर्व वर्ण लघु आणून ४९ आर्या रचून रामायणाची कथा साधली आहे. हें किती चातुर्याचें काम आहे तें पाहावें.

## मंत्रमय रामायण

| | |
|---|---|
| **श्री**मान्**रा**जशिरो**म**णि | दशरथजोनि**जय**शेंव**राम**हित । |
| द्वि**ज**सेवक**य**ज्ञनिरत | **ज**नभ**य**हर्त्ताध**रा**निका**म**हित ॥ १ ॥ |
| **श्री**शह**रा**बहु**म**ततो | त्याच्याप्रां**ज**ल**य**शस्क**राम**हिला । |
| **ज**ननी**य**ज्ञ**ज**पायस- | पानेंकरिदेसुखाब**राम**हिला ॥ २ ॥ |
| **श्रीराम**ज्येष्ठतनु**ज** | भरत**य**शोनिधिख**रा**कुमार**म**णी । |
| लक्ष्मणशत्रुघ्न**ज**या | न**य**ज**य**रुचिजसिह**रा**ऊमार**म**णी ॥ ३ ॥ |

यांत–**श्रीरामजयरामजयजयराम** हा मंत्र प्रत्यक आर्यांतील अक्षरांत साधून सर्व आर्या रचिल्या आहेत. यांत आपल्या कवीनीं तर फारच आपली कवन करण्याची हातोटी दाखविली आहे.

आपल्या कवीनीं मोठा ग्रंथ आर्या छंदांत लिहिला आहे. तथापि त्यांनीं इतर श्लोकांच्या वृत्तांतही लहान लहान बरेच ग्रंथ रचिले आहेत. यांमध्यें हा पुढला केकावलीचा लहानसा स्तोत्ररूप ग्रंथ पृथ्वो छंदांत रचिला आहे. याशिवाय त्यांचीं आणखी कवनेंही आढळतात.

## पद

वरअसाविभोदेकींवत्सागामल्लीला ॥ धृ० ॥

पदवीश्रीचीगोपीकांला ।

दिवलीवैकुंठींचीबल्लवपल्लीला ॥ वरअसा० ॥ १ ॥

तुझ्याकीर्तिमात्रेंपुढें ।
नपुसेकोणीधन्वंतरिच्याखळीला ॥ वरअसा० ॥ २ ॥

भक्तमयूरघनाजावा ।
नसुरद्रुमयाचकनीचाच्यागळीला ॥ वरअसा० ॥ ३ ॥

## पद.

सुखकरामुकुंदारामाकृष्णागोपाला ॥ धृ० ॥
केशवामाधवाहरे ।
नुरवींभोथाकामालोभाकोपाला ॥ सुख० ॥ १ ॥
जगदाकारातुलाम्यालों ।
जेविंभुजगमानुनिकनकाच्यागोपाला ॥ सुख० ॥ २ ॥
भक्तमयूरसुखघना ।
हानतजनतवपदिंतुलर्थाचाहोपाला ॥ सुख० ॥ ३ ॥

## पद.

यशभुवनवनवसंताचें गावेंनवनवसंताचें ॥ धृ० ॥
द्रुहिणम्हणेतुजचक्रापासुनि रक्षायामीनशकें ।
सशकेंसिंहकसामारावा कींपक्षीश्वरमशकें ॥ यश० ॥ १ ॥
विष्णुम्हणेम्यांकायकरावें एथेंतापसराया ।
तापसरायादांयेकचि तुजमजतापसराया ॥ यश० ॥ २ ॥
मृत्युंजयहिम्हणेवाराया दुर्बलमींयाअरिला ।
याहुनिअन्यावारिनतुझ्या कालाद्युग्राअरिला ॥ यश० ॥ ४ ॥

* * *

## अभंग.

तोखपावेतोकथानें तोकथानेंपावती ॥

* * *

आपल्या कवींचें सरस व प्रौढ शब्द ठेवण्यांत आणि प्रास व यमकें साधण्यांत जें अपूर्व चातुर्य दिसतें, त्याविषयींचें वरील थोडया उदाहरणांवरून स्थालीतंदुलन्यायेंकरून योग्य अनुमान वाचकांनीं केलें असतां व्हावयाजोगें आहे.

सांप्रत प्रस्तुत ग्रंथविषयक कांहीं अभिप्रेतार्थांचें कथन इष्ट जाणून करितों. आपल्या इष्ट देवतांचें अथवा पुण्यश्लोक देवांचें अथवा अवतारी पुरुषांचें स्तवक

ज्यांत केलें असतें, त्या लहान ग्रंथास स्तोत्र म्हणतात; हें बहुधा सर्वांस ठाऊक आहे. अशीं स्तोत्रें मोरोपंतांनीं पुष्कळ केलीं आहेत, त्यांतील केकावलि हा एक ग्रंथ समजला पाहिजे. हा त्यांच्या स्तोत्ररूप ग्रंथांमध्यें मोठा विख्यात ग्रंथ होय. केकावलि शब्दाचा अर्थ असा होतो कीं, केका म्हणजे संस्कृत भाषेंत मोराच्या शब्दास म्हणतात, म्हणजे ज्याला शुद्ध मराठींत मोराचा टाहो असें म्हणतात, त्याची जी आवलि म्हणजे पंक्ति, अर्थात् एकामागें एक मोराचे टाहो, त्यांस केकावलि म्हणावें. आतां आपल्या कवीनें आपलें नाम सार्थक करून आपल्यास मयूरपक्षी कल्पून कृपाघन जो भगवान त्याला उद्देशून आपले जे एकामागें एक प्रार्थनारूप श्लोक त्यास केकावलि म्हटलें आहे; आणि हें अभिधान आपल्या कवीच्या सरस रुचीस अनुरूप आणि शुभदायक होय असें समजलें पाहिजे. यद्यपि मोरोपंत हे रामोपासक होते असें प्रसिद्ध आहे, तथापि त्यांच्या कृतीवरून जी त्यांची अंतःकरणवृत्ति अनुमित होते, तिजवरून मला तर स्पष्ट दिसतें कीं, जरी त्यांचें उपास्यदैवत राम होतें, तरी त्यांची सर्व देवांविषयीं पूज्यबुद्धि असून ते परम भाविक आणि श्रद्धालु पुरुष होते यांत मला किमपि संदेह वाटत नाहीं. नुसती देवतांविषयींच त्यांची पूज्य बुद्धि होती असें नाहीं; परंतु भाविक वारकऱ्यांसारखी संतसाधूंविषयींहि त्यांची अत्यंत प्रेमळ बुद्धि होती, असें त्यांच्या सहाजिक वाणीवरूनहि दिसतें. परंतु हा आपला प्रेमळभाव त्यांनीं आपल्या सन्मणिमालेंत विशेषेंकरून प्रगट केला आहे. या देशांत विख्यात जे अलीकडचे साधुसंत त्यांची त्या ग्रंथांत त्यांनीं नमनपूर्वक थोडक्यांत स्तुति केली आहे. तींत शिंपी, सोनार, वाणी, माळी, कुंभार, चांभार, महार, कसाई, आणि मुसलमान इत्यादि ब्राह्मणांनीं नीच मानिलेल्या जातीच्या साधूंसही त्यांनीं आपल्या नमस्कारानें ब्राह्मणाच्या पंक्तींत आणून बसविलें आहे असें स्पष्ट दिसतें; पाहा हे—नामदेव, नरहरि, तुकाराम, सांवता, गोऱ्हा, रोहिदास, चोखामेळा, सजना, कबीर आणि शेख महम्मद, या साधूंविषयीं कसें बोलतात तेंः—

भक्तिसुखाधिकमानुनि मुक्तिसुखकदापियाचिनाम्यातें ।
अत्यद्भुतआयकिलें सद्धृदींनमुनियाचिनाम्यातें ॥
नरहरिनामापावे संतनसोनारदासमानकसा
तरलाकरुनिभवाचा अंतनसोनारदासमानकसा ॥
करजोडितांसुटाया तनुरूपातापहेतुकारामीं ।
कींसतनुमुक्तझाला योगाचीसिद्धिहेतुकारामीं ॥
जेंसांवताकरुनिदे उदरश्रीमंदिराभवनमाळी ।
त्यातेंप्रेमेंवसवुनि मानीश्रीमंदिराभवनमाळी ॥

गोराज्याम्हणतीत्या स्मरुनिसुखीतूंमनाकुलालाहो ।
घेभक्तिचाजयाची मतिसंसारींअनाकुलालाहो ॥
बहुमानितींनकोणी जेरोहीदासचर्मकामानें ।
तेनपहावेपाहुनि तपनपहावाचिधर्मकामानें ॥
गात्रानचमानावा चोखामेळामहारसामान्य ।
जाच्याकरिसाधूंचा चोखामेळामहारसामान्य ॥
सज्जनानामजयाचें ज्यागातीसाधुजनकसायास ।
भगवान्पळहिनविसरे ज्यातेंविसरेनमंकरायास ॥
मायाहेसंसृतिची जाळुनिसशोकतोकबीरमला ।
रामपदाब्जींअलिसा बहुमतसमुदोक्तोकबीरमला ॥
तारितिनकीर्तिच्याजो नलवेत्यामुसलमानवानावा ।
हर्षेंशेखमहंमद भगवज्जनमुसलमानवानावा ॥

या वरील उदाहरणावरून हे आपले कवि परम साधु आणि अत्यंत प्रेमळ वृत्तीचे पुरुष होते असें स्पष्ट दिसतें, आणि प्रस्तुत ग्रंथावरूनही बुद्धिवान पुरुषांच्या लक्षांत असें आल्यावांचून राहाणार नाहीं. या ग्रंथांत त्यांनीं विष्णूस उद्देशून स्तवन केलें आहे. पहिल्या तीन केकांत शिष्टसांप्रदायानुसार आपल्या आराध्य दैवताच्या चरणांचें माहात्म्य वर्णून त्यांस अभिवंदन केलें आहे. हा सांप्रदाय परम स्तुत्य होय; कारण येणेंकरून वंदन करणाराचा अत्यंत नम्रीभाव प्रस्फुट होतो. पुढें आपलें पातित्य आणि पतिताचें उद्धरण करण्याचें भगवंताचें शील यांचें वर्णन केलें आहे. प्रार्थना करण्याच्या ओघांत जसजसा बोलण्याचा प्रसंग येत गेला, तसतसें कोठें विनय, कोठें सलगी, कोठें रोष, आणि कोठें आपला लडिवाळपणा अशा भिन्न भिन्न भावाचें दर्शन करून ही सर्व ग्रंथरचना केली आहे; परंतु त्या रचनेंत कांहीं विशेष अनुक्रम धरून आपल्या अभिष्ट अर्थाचें निवेदन केलें आहे, असें मला दिसत नाहीं. यांत ग्रंथकाराचें मागणें इतकेंच दिसतें कीं, भगवंतानें आपल्या अपराधाची क्षमा करावी, आणि आपला अंगीकार करावा. ज्ञानी जनांस भगवंतापाशीं मागणें हेंच उचित होय.

आतां याचक जनांनीं कोणत्या भावानें वदान्यापाशीं प्रार्थना करावी;—त्यांत, अत्यंत अल्पज्ञ, पापमालिन्यानें अंतर्यामी आपादमस्तक मलिन आणि प्रतिक्षणीं अपराधी, अशा नरदेहधारी पामर जीवानें सर्वज्ञ, अत्यंत पवित्र, न्यायी, आणि षड्गुणैश्वर्यसंपन्न, अशा जगदीश्वरापुढें आपल्या अपराधाची क्षमा भाकणें झाल्यास तर सर्व भाव एकीकडेस टाकून शुद्ध विनयतेच्या भावानें प्रार्थना करणें उचित. असें असतां आपल्या कवीनें तर या स्तोत्रांत आपल्या विनयतेच्या भावांत

भावांतरांचें पुष्कळ विरजण घातलें आहे. तेव्हां ही यांची कृति अशा दृष्टीनें दोषप्रवण म्हटल्यानें आपणाकडेस धृष्टतेचा आरोप येणार नाहीं, असें बहुतेक सूज्ञ विचारी पुरुषांचें मत पडेल. या गोष्टीचा लक्षपूर्वक विचार केला असतां हें मत उपेक्षणीय आहे असें मला वाटत नाहीं; पूर्ण अंशीं नसलें तथापि पुष्कळ अंशीं हें मत ग्रहणीय होय असें माझ्या विचारास येतें. ईश्वराचें महत्त्व आणि पवित्रता, आणि मनुष्याचें क्षुद्रत्व आणि पापमलीनता, यांविषयीं विचार केला असतां जें महदंतर दिसतें, त्यावरून पाहातां मनुष्यानें तर ईश्वरापुढें धुळींतच पडून असावें; मान उचलून वर त्याजकडेस पाहाण्याचीही याची योग्यता नाहीं; असें असतां त्या ईश्वराला उद्देशून केली जी प्रार्थना तींत प्रार्थकानें सलगी अथवा लडिवाळपणा, अथवा रोष, यांतून कोणत्याही भावाचें प्रदर्शन करणें, हें तर त्याला केवळ अनुचित होय.

परंतु ज्या लोकांमध्यें जीवात्मा आणि परमात्मा यांच्या ऐक्यभावाचे प्रतिपादक आजपावेतों शतावधि आचार्य आणि उपदेशक होऊन गेले; आणि त्यांनीं लिहिलेले सहस्रावधि ग्रंथ चालून अद्वैत मताचा प्रचार फार होऊन गेला आहे; आणि ज्यांमध्यें ज्या श्रुतींच्या पायावर अद्वैतमताचें मंदिर बांधलें होतें, त्या सर्व श्रुती मध्वाचार्यांनीं आपणाकडेस वळवून त्यांच्या योगानें जीवात्मा आणि परमात्मा यांचें तादात्म्य असंभवनीय असा आपला सिद्धांत प्रदर्शित करून, जीव सेवक आणि परमात्मा सेव्य,–सलोकता, समीपता आणि सरूपता, या तीन काय त्या जीवांस मुक्ति; सायुज्यता अथवा कैवल्यमुक्ति जीवांस कदापि होणार नाहीं असा आपला सिद्धांत स्थापून आपल्या द्वैतमतानें अद्वैत मताच्या खंडनार्थ प्रयत्न केला; आणि अद्यापि त्यांचे अनुयायी माध्व करीतच आहेत;–पुढें त्या मोठ्या कलहांत रामानुजांनीं दोघांची समजूत पाडण्याकरितां मध्यें कावड करून विशिष्टाद्वैत मताची स्थापना केली; तथापि त्यांमध्यें अद्वैत मताची अबाधित सत्ता चालण्यांत कांहीं मोठा प्रतिबंध झाला असें नाहीं. परंतु जेव्हां अद्वैतवादी घरोघर चुलीपर्यंत ब्रह्मज्ञान ऐकून आपणच कंटाळले, आणि पापपुण्याचा विचार लोकांमध्यें अत्यंत शिथिल झाल्यानें अनाचाराचा बाजार कडेलोट भरूं लागला, असें पाहून जेव्हां तेच भ्याले,–ही लोकांची स्थिति तुकोबानें खालीं सरस वर्णिली आहे:—

घरोघरींअवघेंझालेंब्रह्मज्ञान । परीमेळवणबहूमाजी ॥ १ ॥
निरेंकोणापासींहोयएकरज । तरींयारेमजदुर्वळांसी ॥ २ ॥
आशातृष्णामनींकालवूनीदोनी । दंभतोदुरूनीदीसतसे ॥ ३ ॥
कामक्रोधलोभशिणवीवहुत । मेळवूनींआंतकाळकूट ॥ ४ ॥
तुकाम्हणेतेथेंकांहींहातानये । आयुष्यतेंजायेवांयासर्व ॥ ५ ॥

यापेक्षां आणखी भयंकर;—

जीवतोचीदेवभोजनतेंभक्ती । मरणतेमुक्तीपाखंडयाची ॥ १ ॥
पिंडाच्यापोषणींनागवलेजन । लटीकेंपूराणकेलेवेद ॥ २ ॥
मनाआलातैसाकरीतीविचार । म्हणतीसंसारनाहींपुन्हा ॥ ३ ॥
आपूलेमनींचेंकल्पनीपाखंड । जनामध्येंभांडपोटभरी ॥ ४ ॥
तुकाम्हणेपाठीउठतीयमदंड । पापपुण्यलंडनविचारितो ॥ ५ ॥

अशी लोकांची स्थिति पाहून जेव्हां अद्वैतवादी आपल्या मार्गाचें अतिक्रमण झाल्यामुळें आपणच थकले; तेव्हां आजपावेतों विसरून गेलेल्या आपल्या भक्ति-माउलीपुढें त्यांनीं साष्टांग दंडवत घातला, आणि म्हणूं लागले;—

नायकावेकानींतयाचेतेबोल । भक्तीवीणफोलज्ञानसांगे ॥ १ ॥
वाखाणीअद्वैतभक्तीभावेंवीण । दुःखपावेशीणश्रोतावक्ता ॥ २ ॥
अहंब्रह्मम्हणुनीपाळीतसेपिंड । वोलोंनयेभांडातयासवें ॥ ३ ॥
वेदबाह्यलंडबोलेजोपाखंड । त्याचेंकाळेंतोंडसंतांमध्यें ॥ ४ ॥
तुकाम्हणेखंडीदेवभक्तपण । वरिष्ठत्याहूनश्वपचतो ॥ ५ ॥

आणखी म्हणूं लागले:—

गोडनावेंक्षीर । परीसाखरेचाधीर ॥ १ ॥
तैसेंजाणब्रह्मज्ञान । वापुडेंतेंभक्तीवीण ॥ २ ॥

आणि तिच्या पायांशीं नाक घांसून, करुणा भाकूं लागले,—माते आम्हीं चुकलों; आजपावेतों आम्हास असें वाटत होतें कीं, आमच्या अद्वैतब्रह्मज्ञानानें आम्हास मोठमोठे पांख फुटले आहेत, त्यांच्या योगानें आतां आम्हीं कैलास आणि वैकुंठ यांच्याही पलीकडेस वर चिदाकाशांत उडून जाऊं; त्वां आमच्या चंचूंत चारा भरवून आमचें संगोपन करावें याचें आतां कांहीं अगत्य उरलें नाहीं; तुझ्या चोंचीं-तला चारा आम्हास नको; आम्हीं स्वतंत्र उड्डाण करून यापेक्षां आपला चांगला चारा मिळवूं;—असा जो आम्हांस गर्व झाला होता तो आतां अगदीं उतरून गेला. आम्हीं तुझा विश्रांतीचा घरकुंडा सोडतांच हे आमचे अद्वैतज्ञानाचे पांख आम्हास तोलत नाहींसे होऊन आम्हीं खालीं पडूं लागलों; कित्येक जे गर्वानें कांहींसे वर उडाले त्यांस अधिक धक्का बसून त्यांचा चुराडा झाला आतां आमच्या अनुभवास पक्कें आलें कीं, तुझ्या मुखांतल्या चाऱ्याच्या सेवनावांचून इतके मोठे पांख झेप-ण्याचें सामर्थ्य आम्हास कदापि येणार नाहीं; आणि जरी त्या चाऱ्यानें तसें उड-ण्याचें सामर्थ्य आलें, तथापि तुझें कोटें न सोडितां तूं जेथें आम्हास नेशील तेथें

उडून तूं दाखविशील तोच चारा आम्हीं भक्षण करूं, यांतच आमचें सर्व कल्याण आहे; असें म्हणून अद्वैतवादी भक्तिमातेस शरण गेले. परंतु जरी शरण गेले, तरी उनाड मुलें जशीं इकडे तिकडे यथेच्छ उड्या मारून भूक लागली म्हणजे आपल्या आईजवळ खाऊ मागावयास जातात, तसे शरण गेले. अपराधी लोक न्यायाधिशापुढें उभे राहून केवळ सभयतेनें आपला अपराध अंगीकृत करून, त्या कृतअपराधाविषयीं आपला पश्चात्ताप प्रकट करून मोठ्या विनयतेनें आणि दीनवाणी तोंडानें क्षमा मागावयास जातात तसे गेले नाहींत. मुलें जशीं आपल्या आईबापापाशीं कांहीं वस्तु मागतांना आपला लडिवाळपणा, सलगी, रोष, इत्यादि भाव दाखवितात तसे या देशांत भक्तजन आपल्या इष्ट देवतेपुढें यथारुचि अनर्गल वाक्पटवानें अनेक भाव दाखवून वर मागतात. त्यांमध्यें विनयभाव नसतो असें माझें म्हणणें अगदीं नाहीं; हें तर माझ्या वरील लेखावरून वाचकांच्या लक्षांत पूर्तेपणीं आलेंच असेल; परंतु त्या भावाच्या विरजणांत भावांतराचें पुष्कळ मिश्रण असल्यानें त्या भावास बलहीनत्व येऊन प्रार्थनीय परमेश्वराचें महत्व आणि गौरव यास फार गौणत्व आल्यासारखें दिसतें असें मला खचित वाटतें. कारण, परमेश्वर आईपेक्षांही दयाळू आहे हें खरें आहे, तथापि तो न्यायी आहे, म्हणून लाडानें आपल्या मुलांस बिघडविणाऱ्या भोळ्या आईसारखी ती आई नाहीं; परंतु जीं मुलें आपल्या आज्ञेचें उल्लंघन करून उन्मार्गवर्ति होतात, त्यांस छडी मारून सन्मार्गास लावून सुखी करणाऱ्या शहाण्या आईसारखी ती आई आहे. किंबहुना परमेश्वराचें महत्व आणि सर्वैश्वर्य जर मनांत आणिलें, तर आईच्या सामान्य उपमेपेक्षां त्याच्या महत्वास आणि ऐश्वर्यास दयाळु आणि न्यायी अशा प्रभूची उपमा अधिक योग्य दिसती; म्हणून ज्यास स्वापराधाचें ज्ञान होऊन पश्चात्ताप झाला असेल अशा क्षुद्र मानवानें परमेश्वरापुढें शुद्ध विनयभावानेंच प्रार्थना करावी, हेंच त्यास उचित होय असें माझें मत होय. आणि या मतदृष्टीनें पाहिलें असतां हें पुढलें आमच्या कवींचें काव्य दोषारोपणास पात्र होण्यास योग्य आहे खरें; परंतु ज्या लोकांमध्यें लडिवाळपणानें आणि सलगीनें ईश्वराची प्रार्थना आणि स्तुति करण्याचा संप्रदाय व्यासाच्या वेळेपासून पडला आहे, त्यांमध्यें आपल्या कवीसच निवडून काढून या दोषाचा भार त्याच्या मस्तकावर ठेवण्यास त्यांस पुढें करणें मला योग्य दिसत नाहीं. सर्वांच्या पंक्तींत यथायोग्य त्या भाराचे विभाग करून त्यांच्या वांटणीस जो यःकश्चित् विभाग येईल तो निराळा काढून ठेवण्याचें जर कोणाच्या मनांत येईल तर भलें येवो.

आतां आणखी एक दोष प्रस्तुत काव्यांत आढळतो, तो पूर्वोक्त दोषापेक्षांही अधिक शोचनीय होय असें विचारशील पुरुषांच्या बुद्धींत वागल्यावांचून राहाणार

नाहीं; आणि वर जी त्यां दयाळु आणि न्यायी अशा परमेश्वराच्या प्रार्थनेंत विनयातिक्रमणरूप दोषाची सूचना केली, त्याच दोषाचें हें परिपक्क फल होय, असें त्यांच्या ध्यानांत येऊन प्रकृत दोष प्रदर्शनांत पूर्वोक्त दोषकथनाचें समर्थनहि होईल. एकदां विनयभाव सुटला म्हणजे सलगीस आरंभ होतो, आणि ती सलगी विनोदास पोहोंचविते; या देशांत, त्यांत विशेषेंकरून संस्कृत काव्यांत, शृङ्गाररसाचें प्राधान्य असल्यानें त्या विनोदांत हा रस प्रचुर होऊन शेवटीं बीभत्स रसाचाही प्रादुर्भाव होतो. असें असलें तरी इतर लोकव्यवहारवर्णनपर काव्यांत समयविशेषीं समर्याद असल्यास शृङ्गार आणि बीभत्स हे रस सुसह्य आणि रुचिपरत्वें आल्हादजनकही व्हावयास शक्य आहेत; परंतु भगवत्स्तुतींत या रसाचें नुसत्या लवणाप्रमाणेंही अल्प सेवन दुःसह, मग या रसाचे द्रोण भरभरून पिणें हें सहास करून भरतखंडनिवासी भक्तजनांनींच करावें; इतरांच्यानें होणार नाहीं. पाहा:—

हरिरिहमुग्धवधूनिकरे विलासिनिविलसतिकेलिपरे ॥ धृ० ॥
पीनपयोधरभारभरेणहरिंपरिरभ्यसरागं
गोपवधूरनुगायतिकाचिदुदंचितपंचमरागं ॥ हरिरिह० ॥

* * *

रासेहरिमिहविहितविलासं ॥ स्मरतिमनोममकृतपरिहासं ॥ धृ० ॥
गोपकदंबनितंबवतीमुखचुंबनलंभितलोभं
बंधुजीवमधुराधरपल्लवमुल्लसितस्मितशोभं ॥ रासे० ॥

* * *

धीरसमीरेयमुनातीरेवसतिवनेवनमाली
गोपीपीनपयोधरमर्दनचंचलकरयुगशाली ॥ धृ० ॥
विगलितवसनंपरिहृतरशनंघटयजघनमपिधानं
किसलयशयनेपंकजनयनेनिधिमिवहर्षनिधानं ॥ धृ० ॥

—गीतगोविन्द

यांत पाहा हे या शृङ्गाररसानें कसे द्रोण भरले आहेत. यापेक्षांही प्रौढ रीतीनें शृङ्गाररसान्वित भक्तिप्रेम पाहाणें असल्यास श्रीमद्भागवताचा मोठा ग्रंथ आहेच. आणखी याशिवाय पाहाण्याची इच्छा असल्यास ब्रह्मवैवर्तक पुराणांतील कृष्णजन्मखंड पाहावें. परंतु वेणिसंहार नाटककारानें तर वैष्णवांसही मळमळी सुटे असा रस आपल्या नांदीच्या एका श्लोकांत ओतला आहे. त्या श्लोकाचा येथें उपन्यास करण्यासही मला लज्जेनें संकोच वाटतो. मग असा शृङ्गाररसान्वित भक्तिप्रेम प्रगट करण्याचा जेथें शिष्टसांप्रदाय प्राचीन काळापासून चालत आहे, तेथें आपल्या

य:कश्चित् प्राकृत कवीनें पुढल्या स्तोत्रांत कोठें सात आठ श्लोकांत या रसाचे एकदोन थेंब ओतले असल्यास (पहा–केका ७,१३,२४,२५,२६,२७,८३, १०२,) हा त्यांजकडेस मोठा दोष न येतां उलटें मला वाटतें कीं, हें त्या रसाचें अत्यल्पत्व त्यांच्या सदभिरुचीचें ज्ञापक होतें. इतकें वादळ चालत असतां त्यांत त्यांनीं आपल्या होडीस तो वारा फारसा न लागूं देतां संभाळलें, हें त्यांचें कृत्य मोठें स्तुत्य होय असें विचारी पुरुषांच्या ध्यानास येईल.

ज्या देशांत व ज्या लोकांत रसभरित म्हणून प्रसिद्ध काव्यें असतात, त्यांच्या गुणांचें यथायोग्य परीक्षण करण्यास, आणि त्याची रुचि घेण्यास त्याच देशाचे डोळे आणि जीभ असली पाहिजे. इतर लोकांच्यानें तसें यथान्याय परीक्षण होणें केवळ अशक्य असें माझें म्हणणें नाहीं; कदाचित् ते विशाळ बुद्धीचे परीक्षक असल्यास योग्य परीक्षा करूं शकतील;परंतु त्यांच्या रुचीनें जो तद्देशीय सज्जांस आनंद होईल, त्याच मानाचा आनंद अन्यदेशीय विद्वानांस होणार नाहीं. याचीं कारणें बहुत आणि सूक्ष्म आहेत. ज्या लोकांत वंशपरंपरेनें त्यांचा सहवास असतो त्यांचा पूर्वापर व्यवहार रीतिभाती, विद्या, ज्ञान, आचार या सर्व गोष्टींच्या संघट्टनानें त्यांचीं मनें तशींच रंगलेलीं असतात; म्हणून त्यांच्या काव्यानें जे हर्षशोकादि विकार त्यांच्या मनावर होतील, तसे विकार अशा संघट्टनाच्या अभावामुळें ज्यांचीं मनें तशीं रंगलीं नसतात त्यांजवर होणार नाहींत. अशा विचारानें पाहिलें असतां हें पुढील स्तोत्र प्रौढ आणि रसिक काव्यांत गणिलें पाहिजे. आणखी माझी अशी अटकळ होते कीं, हें स्तोत्र पंतांनीं आपल्या वयाच्या उत्तर अवस्थेंत रचिलें असावें; ही अटकळ या काव्याच्या प्रौढ वाणीवरून, आणि त्यांत जो प्रतिपाद्य विषय आहे त्यावरून कोणी केली असतां तिचा संभव आहेच, परंतु या स्तोत्रांतील ४६ व्या केकेवरून तर त्याविषयीं कदाचित् संशय असला तर तोहि दूर होईल असें मला वाटतें.

आतां केकावली हें प्राकृत काव्य असून यावर आणखी प्राकृत टीका करण्याचें प्रयोजन काय, म्हणून इतरांच्या तर नाहीं, परंतु कदाचित पंडितजनांच्या मनांत प्रथमतः आशंका उत्पन्न होईल. त्यास हें प्राकृत काव्य खरें, परंतु वामन, मोरोपंत यांसारख्या पंडितांचें काव्य जरी प्राकृत आहे, तरी तें पंडितांसच समजावयास शक्य असें प्राकृत काव्य आहे; त्यांत केकावलीसारखा ग्रंथ तर विशेषेंकरून, या माझ्या म्हणण्यास तेही रुकार देतील. आणखी लोकस्थिति पाहिली असतां ब्राह्मण जातीच्या खाणीशिवाय पंडितरत्नाची उत्पत्तिही असंभवनीय; त्या खाणींतही इतर पार्थिव खाणीप्रमाणें गारगोटेच फार, कोटयावधि गारगोट्यांत एखादें रत्न सांपडलें तर नकळे. त्या पंडितांतही स्वाधीतशास्त्रज्ञानाचा अभिमान एकीकडे ठेवून, प्राकृत कवितेंत कशी चमत्कृति आहे अशी जिज्ञासा धरून, गीर्वाण वाणीच्या

अभ्यासनाच्या माडीवरून प्राकृत ग्रंथ पाहाण्यास खालीं उतरण्याचें लघुत्व आणि श्रम घेणारा शतपंडितांमध्यें एखादा निघाला तर निघेल. तेव्हां या मानानें पाहिलें असतां वामन, मोरोपंत यांचीं काव्यें पाहाणारा दहा लक्षांत एखादा ब्राह्मण सांपडेल; निदान, लक्षांत तरी सांपडला तर सांपडेल. या माझ्या म्हणण्यांत जरी अतिशयोक्ति असली तरी ती फार आहे असें, याविषयीं यथायोग्य विचार करणारे कोणी म्हणणार नाहींत. मग ब्राह्मणव्यतिरिक्त जो फार मोठा समाज राहिला त्याची तर गोष्टच बोलावयास नको. केवळ या कवीच्या ग्रंथांच्या काठिण्यास्तवच यांच्या ग्रंथांचें दुर्ज्ञेयत्व आहे, असें कोणी माझ्या या म्हणण्यावरून समजूं नये; परंतु त्या कारणाशिवाय आणखी बहुधा या देशांतील लोक अनभ्यस्त असून नुसतें वाचण्यालिहिण्याचेंहि ज्ञान त्यांमध्यें फार कमी असतें. यामुळें हे ग्रंथ इतके दुर्ज्ञेय झाले आहेत असें तर मला खचित् वाटतें. त्यांत मोरोपंतांचें काव्य विशेषेंकरून इतकें दुर्बोध कां याचें कारण या उपोद्घाताच्या आरंभीं सविस्तर कळविलेंच आहे. त्यांत आणखी विचार केला पाहिजे कीं, वामन-मोरोपंत यांसारख्या महापंडितांनीं (येथें यांस महापंडित म्हटलें याची शास्त्रीपंडित यांनीं मला क्षमा करावी.) संस्कृत भाषेंत आपले ग्रंथ रचण्याचें तात्कालिक श्लाघ्य कृत्य सोडून प्राकृत ग्रंथ रचण्यांत जे इतके परिश्रम केले, यावरून सद्यःप्राप्त यशाकडेस त्यांनीं लक्ष न देतां इतर सर्व प्राकृत लोकांस ज्ञान व्हावें याच औपकारिक बुद्धीनें त्यांनीं हे ग्रंथ रचले असावे अशी माझी दृढ अटकळ होते. म्हणून हा त्यांचा परम स्तुत्य हेतु सिद्धीस नेण्याच्या मार्गांत ज्या ज्या अडचणी आढळतील, त्या त्या सर्व दूर करणें हा आतां आपला धर्म होय, असें मनांत आणून म्यां ही प्रकृत टीका करण्याचा उद्योग प्रथमतः हातीं धरिला. मोरोपंतांच्या साद्यंत कृतीचा अभ्यास करून, त्यांच्या सर्व काव्यावर टीका लिहून, तें सुबोध करण्याच्या अतिमहत्कृत्यास अवकाशाच्या आणि सामर्थ्याच्या अल्पत्वामुळें प्रथम माझें मन धजेना; म्हणून आपल्या कवीच्या सर्व कृतींत अत्यंत प्रख्यात जीं काव्यें त्यांमध्यें प्रस्तुत केकावलि स्तोत्र हें एक लहानसें प्रख्यात काव्य जाणून म्यां यावर वानगीप्रमाणें पुढील टीका करण्यास आरंभ केला. त्यांतही या लहानशा ग्रंथाचा विषय निवळ भगवत्स्तुतिपर असल्यानें माझें मन अधिक लोभावलें. त्यांत आणखी पंतांच्या काव्यांत निष्णात म्हणून वाखाणिलेल्या पुरुषांमध्येंही बहुतेकांस केकावलि हा ग्रंथ साद्यंत लागत नाहीं, असाही बोभाट माझ्या ऐकण्यांत होताच; या सर्व कारणांवरून मोरोपंतांच्या ग्रंथावर टीका करण्यास हाच लहानसा ग्रंथ म्यां निवडून काढिला.

त्यांत ज्या विस्तारपद्धतीनें प्रथम ही टीका करण्यास म्यां आरंभ केला, त्या गोष्टीस आज पांच वर्षें झालीं. त्या विस्तारपद्धतीचा मुळारंभीं हेतु असा होता कीं, माझी परम आवडती आणि सुशीला कन्या कावेरीबाई, जीस जगदीशानें आतां

दोन वर्षें झालीं आपल्या सन्निध नेलें, तिला ज्या रीतीनें हें काव्य सुबोध होईल अशा रीतीनें पाल्हाळ करून म्यां याजवर टीका लिहिली. ती अशी कीं, कोणताही कठीण शब्द पर्यायावांचून आणि अर्थावांचून ठेविला नाहीं; महाराष्ट्र ग्रंथभाषेच्या रूपांचींही पर्यायरूपें लिहून ठेविलीं; मनांत कीं, तिला या अशा पद्धतीच्या टीकेवरून हा ग्रंथ लागला तर इतर बालांसही सहज लागेल. ही टीका म्यां शके १७८१ च्या वर्षीं ठाण्यांत सरकारी कामावर असतां प्रातःकाळीं मला जो दोनतीन तास वेळ सांपडे, तो या कामाकडेस देऊन आरंभिली, आणि तेथें सुमारें सहा महिन्यांत अर्धा अधिक इतका ग्रंथ संपविला. पुढें सरकारी काम सोडून घरीं मुंबईस आलों, तेव्हां बाकी राहिलेला ग्रंथ लवकरच संपविला. त्यानंतर २३ वी मे सन १८६३ इसवीच्या रात्रीस त्या कन्येस जगदीशानें आपल्या जवळ नेलें. त्या तिच्या वियोगानें अत्यंत दुःखितांतःकरण होत्साता आपल्या मनांत विचार करूं लागलों कीं, तिचें स्मरण राहाण्याकरितां वापी, कूप, तडाग, अथवा धर्मशाळा बांधून एखादें पूर्त कर्म करावें तर तितकें द्रव्यसामर्थ्य आपल्यास नाहीं; तेव्हां जिच्या अभ्यासाकरितां जो ग्रंथ लिहिण्यास प्रथम लेखणी हातीं धरली तोच ग्रंथ आतां तिच्या स्मरणास अर्पण करून प्रसिद्ध करावा, आणि त्यापासून आपल्या स्वदेशीय लोकांस कांहीं उपयोग घडला तर तसें तरी स्मरणीय पूर्तकर्म करावें, असा मनांत विचार करून ज्या रीतीनें आबालवृद्धांस हा ग्रंथ उपयोगी पडेल अशा रीतीनें पुनः याचें पूर्वापर शोधन करून छापण्याकरितां सिद्ध केला.

मला एका गोष्टीची भीति वाटते कीं, प्रौढ बुद्धीच्या पुरुषांस समजावयास अगदीं अवघड नाहींत अशा शब्दांच्याही पर्यायावर पर्याय लिहून, अर्थविस्तारही लांबवून या पुढील टीकेंत फारच पाल्हाळ केला आहे;यावरून कित्येक विद्वज्जन पुढील टीकेस दोष लावितील, त्याचा मी मोठ्या विनयतेनें स्वीकार करितों. परंतु वर जें म्यां कारण सांगितलें त्यावरून त्यांच्या ध्यानांत येईल कीं, हें मोरोपंतांचें लहानसें काव्य केवळ प्रौढबुद्धीच्याच पुरुषांस सुबोध व्हावें म्हणून ही त्यावर पुढील टीका केली नाहीं; तर शाळांत पढणाऱ्या विद्यार्थ्यांस शब्दज्ञान व्हावें, शब्दांचा परस्परान्वय समजावा, आणि कोठें कोठें वाक्यांत अलंकाराचेंही ज्ञान व्हावें,असा जो माझा मुळचा हेतु होता तो तसाच अबाधित ठेवून, त्यास विद्वज्जनांच्याहि आदरास पात्रता यावी म्हणून उत्तरोत्तर अर्थाची दाढर्यता आणि अधिकाधिक अनुकूलता दाखविण्याकरितां जे शब्दांचे पर्याय म्हणून अशी-खूण करून लिहिले आहेत, तेही चढत्या पायरीनें प्रविष्ट केले आहेत; आणि वाक्याचे अर्थ आणि आशयही त्यांच्या गांभीर्याच्या आणि गूढत्वाच्या प्रमाणानें वरच्या घडीपासून आंतील घड्या उकलून दाखविले आहेत; आणि आवश्यक स्थळीं त्यांचे इंगितार्थ आणि

ध्वन्यर्थही सुचविले आहेत. मूळ शब्दाच्या अर्थाची परिपूर्तता दाखविण्याकरितां जेथें शब्दांतराचें अथवा वाक्यांतराचें अंतर्निवेशन आवश्यक, तेथें ⌐अशा खुणेनें तो त्या खुणेच्या मागला अंतर्लेख दाखविला आहे. आणखी स्थळोस्थळीं अर्थाच्या समर्थनाकरितां आणि स्पष्टीकरणाकरितां त्या त्या पृष्ठाखालीं बारीक अक्षरांनीं टीपा करून ग्रंथांतराचीं पुष्कळ संस्कृत आणि प्राकृत प्रमाणेंही दिलीं आहेत. सारांश, हा पुढील मोरोपंतांचा लहान ग्रंथ सर्वांस सुबोधित करण्यांत त्यास जितका योग्य त्यापेक्षांही कदाचित् अधिक श्रम घेण्यांत म्यां आपलें अंग चोरिलें नाहीं; म्हणून विद्वज्जन मजवर कृपाच करितील असा मला भरंवसा आहे. आणखी मला दुसरी अशी भीति वाटते कीं, या माझ्या पुढल्या ग्रंथांत प्रमादानें अथवा माझ्या अज्ञानानें अशुद्ध लेख पडले असतील, आणि कोठें कोठें मूळ अर्थाचीही सूक्ष्मता माझ्या लक्षांत आली नसेल, आणि कोठें विपरीत अर्थही लिहिण्यांत आला असेल, तर शास्त्रीपंडितांनीं आपल्या उदार अंतःकरणांनीं—सांप्रतच्या धर्मशास्त्राप्रमाणें कलियुगांत शुद्ध क्षत्रिय आणि शुद्ध वैश्य हे वर्ण नाहींत, म्हणून तेच सांगतात. तेव्हां अर्थात् ब्राह्मणाभावीं अवशिष्ट राहिलेल्या वेदोक्त मंत्रांनीं असंस्कृत अशा जातींतच माझा जन्म असल्यानें यथाशास्त्र मजकडून शास्त्राध्ययन अथवा काव्यव्युत्पत्ति घडणें दुर्घट, आणि वर्णाप्रमाणें वाणीही असंस्कृत, या कारणाकडेस आपली दृष्टि पोहोंचविली असतां उक्त दोषांविषयीं त्यांची क्षमा मागण्यास मला मोठा अवकाश आहे. आतां ही पुढील टीका केल्यानें जर या आपल्या महत्कवीचा काव्यसमूह समजण्याच्या मार्गाचें मजकडून उद्घाटन होऊन तेणेंकरून स्वदेशविद्यांचें ज्ञान प्रसरणाच्या कार्यांत मजकडून कांहीं तरी सुदामाच्या पृथुकतंदुलार्पणाप्रमाणें साहित्यार्पण झालेंच तर या माझ्या श्रमाचें साफल्य झालें असें मानून मीं समाधान पावेन.

या केकावलि ग्रंथावर पुढील टीका लिहिण्यास आरंभ करावयाच्या पूर्वीं म्यां या ग्रंथाच्या शुद्ध प्रती जितक्या मिळतील तितक्या मिळविण्याचा प्रयत्न केला. त्यांत माझ्या ऐकण्यांत होतें कीं, मोरोपंतांनीं आपल्या सर्व कृतींतून बहुतेक ग्रंथ स्वतः आपल्या हातानें लिहून ठेविला आहे, त्यांत ही केकावलीही आहे. ती सारी त्यांची कृति त्यांचे नातू खालीं पंढरपुरीं सुखवस्ती करून राहातात, त्यांतून एका कुटुंबाच्या संग्रहीं आहे; त्यांच्या मुलांची म्हणजे पंतांच्या पणतांची व माझी गांठ पडली तेव्हां म्यां त्यांस त्यांच्या पूर्वजांच्या ग्रंथावर टीका करून त्यांचें उज्ज्वलन करून पंतांची सेवा करण्याचा आपला मनाचा निर्धार सांगितला; आणि या कार्यांत त्यांनीं कृपा करून पंतांच्या हातचा लिहिलेला केकावलीचा ग्रंथ त्यांच्या संग्रहीं आहे तो शेवटीं दोन दिवस तरी मला पाहाण्यास द्यावा, म्हणजे संशयरहित शुद्ध ग्रंथावर टीका होईल; इतकें साहित्य त्यांनीं आपल्या

वडिलांच्या कीर्तीच्या वृद्ध्यर्थ करावें म्हणून म्यां त्यांस फार विनवणी केली; परंतु हा वेळपर्यंत तसें घडून माझी इच्छा सफल झाली नाहीं. शेवटीं केकावलीचें एक पुस्तक शिलाछापावर छापिलें होतें त्याची एक प्रत माझ्या संग्रहीं होती, ती आणि पुण्याहून आमचे जुने मित्र राजश्री परशुरामपंत गडबोले यांनीं आपल्या हातानें केकावलीचें पुस्तक शुद्ध लिहिलें होतें तें त्यांजकडून कांहीं दिवस मागून आणविलें तें, अशा दोन प्रतीवरून कोठें शुद्धाशुद्ध पाहून ही पुढील प्रत सिद्ध करून या ग्रंथावर टीका केली आहे. पंतांच्या हातचें लिहिलेलें पुस्तक जर या कार्यांत पाहाण्यास मिळतें, तर फारच चांगलें होतें; परंतु मला असें वाटतें कीं, या पंतांच्या ग्रंथाचें फारसें पाठांतर झालें नसावें. कोठें मूळचा पाठ बदलला असला तर तो फारच थोडा असेल. शतपंडितांमध्यें एखादा पंडित प्राकृत ग्रंथाचें आस्थापूर्वक अवलोकन करणारा सांपडेल, म्हणून जें म्यां वर सांगितलें, त्याच विरळ कोटींत परशुरामपंत यांची गणना केली पाहिजे. त्यांनीं पंतांच्या काव्यावर फार लक्ष दिलें आहे, आणि त्यांनीं आपलें हातचें लिहिलेलें केकावलीचें मूळ पुस्तक उपयोगी पडण्याकरितां माझ्या स्वाधीन केलें, ही त्यांची मजवर मोठी स्मरणीय उपकृति आहे असें मी समजतों.

जगत्पिता परमेश्वर यास प्रथम दंडवत प्रणिपात करून, नंतर ज्यांच्या उदरीं त्या जगदीशानें मला जन्म दिला त्या परमवंद्य आणि प्रेमास्पद मातापित्यांचें नामयुग्मानें या माझ्या टीकेस अभिधान देऊन, यश देणारें मातृनाम यशोदा आणि त्या यशाची निर्मलता दर्शविणारें पितृनाम पांडुरंग, अशा नामयुग्मास वंदन करून या उपोद्घातासहित आतां मी आपला ग्रंथ संपवितों.

निवासस्थान मुंबापुरी<br>
चैत्र शु० १० शके १७८७ क्रोधनाम संवत्सरे.<br>
मु ॥ ५ वी माहे एप्रिल सन १८६५ इसवी.

दादोबा पांडुरंग.

# श्री दासगणूंचा अभिप्राय.

" दासगणूंचा अनेक आशीर्वाद. श्री साईलीला मासिक पुस्तक पोंचलें. कै. दादोबा पांडुरंग, मराठी भाषेचे पाणिनी यांनीं आपल्या चिकित्सक बुद्धीनें यशोदा पांडुरंगी नांवाची सुबोध व सरस टीका कविकुलगुरु आर्याचार्य श्री मोरोपंत यांच्या केकावलि नांवाच्या जगप्रसिद्ध सर्वोत्तम काव्यावर केली, तिचा आपण साईलीलेमार्फत जीर्णोद्धार करीत आहांत, हें आपणांस निःसंशय भूषणावह आहे. मला वाटतें, श्री साईलीलेचा एकचतुर्थांश भाग श्री यशोदा पांडुरंगीकरितां राखून ठेविल्यास महाराष्ट्र वाचकांवर आपले उपकार होणार आहेत. कारण अलीकडे ही टीका अगदीं दुर्मिळ झाली आहे. मी यशोदा पांडुरंगी नांवाची टीका वाचली नव्हती; नुसतें तिचें नांव ऐकत होतों; बाबासाहेब, फार काय सांगावें, ही टीका वाचीत असतांना माझे डोळे कित्येक वेळ भरून आले व टीकाकाराच्या उच्च दर्जाच्या विवेचनशक्तीचें कौतुक वाटलें.

असो. टीका आपल्या हातानें श्री साईलीला मासिकांत पूर्ण येवो, अशी त्या जगन्नियंत्याची व श्री साईबाबांची प्रार्थना करून रजा घेतों. लोभ असावा हे आशीर्वाद."

**दासगणू.**

# वर्गणीदारांकरितां

१ श्रीसाईलीलेचा वर्षारंभ चैत्र महिन्याचे अंकापासून आहे. नवीन वर्गणीदारांस वर्षारंभापासून अंक घ्यावे लागतील.

२ पत्ता बदलणें झाल्यास लगेच आम्हांस कळवावें. बदललेला पत्ता न कळविल्यामुळें कित्येक वेळां अंक गहाळ होतात.

३ अंकासंबंधीं पत्रव्यवहार आमचेकडे करावा.

४ लेखासंबंधीं पत्रव्यवहार संपादक व प्रकाशकांकडे करावा.

# वार्षिक वर्गणी.

वार्षिक वर्गणी टपाल खर्चासह मनिऑर्डरनें अगाऊ रु. ३।=, व्ही. पी. नें रु. ३॥, फुटकळ अंक ।= मागील अंकास शिल्लक असल्यास ॥-

व्यवस्थापक—**श्रीसाईलीला**

# लेखकांकरितां

१. श्रीसाईलीलेंत प्रसिद्धीसाठीं पाठविलेला लेख अथवा कविता कागदाच्या एका बाजूवर,मार्जिन सोडून,सुवाच्य बालबोध लिपींत असावी. पेन्सिलीनें किंवा कागदाचे दोन्हीं बाजूस लिहिलेला मजकूर छापण्यास फार त्रास पडतो.

२. लिखाणासोबत पूर्ण नांव व पत्ता दिला पाहिजे. नांव प्रसिद्ध न करितां टोपण नांवाखालीं प्रसिद्धि द्यावयाची असल्यास त्याप्रमाणें कळवावें.

३. लेख अथवा कविता हातीं आल्यानंतर १ महिन्यांत पसंति अगर नापसंति कळविली जाईल. पसंति कळविल्यानंतर, आम्हांला कळविल्याशिवाय लेखकांनीं तो मजकूर दुसरीकडे छापविण्यास देऊं नये.

४. लेखांत योग्य तो फेरफार करण्याचा अधिकार आमचेकडे राहील. येईल तसा शब्दशः प्रसिद्ध करण्याची हमी आम्हीं घेत नाहीं.

५. लेखासोबत पुरेसें पोस्टेज आल्यास, नापसंत लेख परत करूं.

प्रकाशक—**श्रीसाई लीला**

श्री साईनाथ प्रसन्न.

# श्री साईलीला

मासिक पुस्तक.

वर्ष ८ वे ] अं ८ [ आश्विन

नलिनीदलगत जलमतितरलम् । तद्वज्जीवनमतिशय चपलम्



क्षणमपि सज्जनसंगतिरेका । भवति भवार्णव तरणे नौका:

—शंकराचार्य.

संपादक:—रामचंद्र आत्माराम तर्खड.

# अनुक्रमणिका.


| | |
|---|---|
| पुण्यतिथि उत्सव आणि उत्सवाचा कार्यक्रम ... ... | १—२ |
| अनुभव ... ... ... ... ... ... | १—३ |
| अनुभव ... ... ... ... ... ... | १—६ |
| श्री कायम फंड खातें ... ... ... ... | १—४ |
| श्री भक्तमंडळ खातें ... ... ... ... | ५ |
| शैलधी अर्थात् शिर्डी वर्णन ... ... ... | १—८ |
| श्रीसमर्थ सद्गुरु साईबाबा महाराजां.ा पुण्यतिथी-दिन व पुण्यतिथी विधिनिर्णय ... ... ... ... | १—६ |


## विनंति.

सुप्रसिद्ध श्री मोरोपंत कविकृत **केकावलि** या भक्तिरसप्रेमामृतानें ओथंबलेल्या काव्यावर कै. रा. ब. दादोबा पांडुरंग यांची “ यशोदा पांडुरंगी ” टीका जी साठ वर्षांपूर्वी छापून प्रसिद्ध झाली होती व आजमितीस अत्यंत दुर्मिळ झाली होती तिची दुसरी आवृत्ति छापून तयार झाली आहे. किं. रु. २.

कै. गोविंदराव रघुनाथ दाभोळकर यांचा सुप्रसिद्ध ओजस्वी व प्रासादिक श्रीसाईसच्चरित हा ग्रंथ बांधून तयार आहे. पानें अदमासें १०००. किं. रु. २--८--०.

**रा. आ. तर्खड.**

व्यवस्थापक—**श्रीसाईलीला कचेरी.**

## श्री साई भक्तांस विज्ञप्ति.

कोणाला श्री साईमहाराजांबद्दलचे त्यांचे स्वतःचे अनुभव श्री साईलीलेंत प्रसिद्ध व्हावे म्हणून पाठविण्याचे असतील त्यांनीं ते आमचेकडे पाठविल्यास ते प्रसिद्ध होण्याबद्दल आदरपूर्वक योग्य तो विचार होईल.

रा. आ. तर्खड

—प्रकाशक

॥ श्रीसाईबाबा प्रसन्न ॥

# पुण्यतिथि उत्सव

कृ. सा. न. वि. वि. श्री. समर्थ सद्गुरु साईमहाराज यांची पुण्यतिथि येत्या आश्विन शु. १० बुधवार शके १८५३ ता. २१-१०-३१ रोजीं श्रीक्षेत्र शिर्डी येथें महाराजांच्या मंदिरांत होणार आहे. तरी या समयीं आपण कृपा करून आपल्या कुटुंबांतील बाळगोपाळांसह व मित्रमंडळीसह तीर्थप्रसादास अवश्य यावें, अशी नम्र विनंती आहे.

सदर्हू कार्यासाठीं वर्गणी पाठविणें असल्यास ती खालीं दर्शविलेल्या कोणत्याही सद्गृहस्थांकडे पाठविण्याची कृपा व्हावी.

१ श्रीयुत रा. आ. तर्खड, ऑ. खजिनदार, १० जर मॅन्शन, वांद्रें.

२ श्रीयुत सुंदरराव दि. नवलकर, ऑ. चिटणीस, १४१ साईभुवन, प्रिन्सेस स्ट्रीट, मुंबई नं. २.

३ रावसाहेब. बा. वि. देव, ५२ स्टेशनरोड, ठाणें.

४ श्रीयुत बापुराव राघवजी बोरावके, अं. दुय्यम चिटणीस, शिर्डी.

ता. कोपरगांव, जि. नगर.

आपले आज्ञांकित,



**मोरेश्वर विश्वनाथ प्रधान**
**बाळकृष्ण विश्वनाथ देव**
**तात्याजी गणपत पाटील कोते**
**सखाराम बळवंत धुमाळ**
**वासुदेव नारायण चांदोरकर**

श्रीसाईबाबा शिर्डी संस्थानचे ट्रस्टी.

# उत्सवाचा कार्यक्रम.

**ता. २१-१०-३१ आश्विन शु० १० बुधवार.**

सकाळीं:—संस्थानचा रुद्राभिषेक व पवमानाभिषेक मंगलस्नान, पूजा व आरती व विधियुक्त पुण्यतिथि श्राद्ध.

दुपारीं:— प्रसाद, पुराण व कीर्तन.

रात्रौ:— भजन, रथाची मिरवणूक.

**ता. २२-१०-३१ आश्विन शु० ११ गुरुवार.**

सकाळीं:—संस्थानचा अभिषेक, स्नान, पूजा व आरती.

दुपारीं:— फराळ किंवा भोजन व पुराण.

रात्रौ:— भजन, पालखी व चावडी.

**ता. २३-१०-३१ आश्विन शु० १२ शुक्रवार.**

सकाळीं:—काल्याचें कीर्तन.

दुपारीं:— पुराण. नंतर ग्रामभोजन.

# अनुभव.

श्रीयुत काशीनाथ सखाराम पाटील राहाणार पेण हे आपले श्रीसाई माउलींचे सध्यांचे अनुभव येणेंप्रमाणें प्रत्यक्ष कळवीत आहेत. हे गृहस्थ एक साधारण स्थितींतले कामगारवर्गापैकीं आहेत, आणि मुंबईस सुतारकाम, यांत्रिक फिटरकाम वगैरे करून आपला चरितार्थ चालवीत असतात. शिर्डीच्या श्रीसाई बाबांवर त्यांची पूर्ण श्रद्धा आहे, आणि जेव्हां जेव्हां शिर्डीस कांहीं दुरुस्तीच्या कामासाठीं त्यांना पाठविण्यांत येत असतें त्या वेळीं उत्साहानें हातां-तलीं कितीही कमाईचीं कामें असलीं तरी तीं बाजूला सारून, शिर्डीस श्री-समर्थांच्या कामासाठीं ते जात असतात.

(१) पेणला खाडीमध्यें यांच्या कुटुंबाच्या मालकीची भातजमीन आहे. मोठें उधाण ( म्हणजे वसंत ऋतूंतील मोठी भरती ) येण्यापूर्वीं पाऊस पडून त्या तापलेल्या जमिनीत बीं पडलें असतां आणि नंतर उधाणाचें खारें पाणी त्या जागेवर येऊन गेलें असतां, पीक उत्तम प्रकारचें येतें असा त्या गांवच्या गांवकरी लोकांचा पूर्ण अनुभव आहे.

त्याप्रमाणें यंदां पाऊस पडण्यास विलंब झाला. उधाणाचें खारें पाणी त्या जागेवर फिरून त्या जागेची ऊब नष्ट झाली. आतां पाऊस पडला तरी पीक रुपयांत आठ दहा आणे उतरेल असें वाटलें.

नक्षत्रावर नक्षत्रें कोरडीं जाऊं लागलीं, त्यामुळें कुलाबा व ठाणें जिल्ह्यांतील शेतकरी हवालदिल झाले. इतक्यांत पाऊस पडला. पेरण्या झाल्या. धान्य उगवलें. वीत दीड वीत वर आलें. नंतर लावण्या झाल्या. शेतें जोमदार दिसूं लागलीं. सर्वांना आनंद वाटला. त्यानंतर सर्व कोंकण प्रांतांत भयंकर वृष्टि झाली. आठवड्यावर आठवडे पावसाची सारखी झोड लागली. सर्व शेतें पाण्यांत बुडालीं. त्यांत काशीनाथाचें शेत विशेष खोलगट जागेंत होतें. सर्वांची निराशा झाली. तशा पाण्यांतून काशिनाथाच्या शेतांतले कोंब पाण्या-वर डोकावूं लागले. त्याचें शेत बचलें. बाकीचीं उंचवट्यावरचीं शेतें ज्यांची वचण्याची आशा होती तीं सर्व शेतें नष्ट झालीं. या गोष्टीचा उलगडा नाहीं. काशीनाथाची व त्याच्या घरांतल्या सर्व मंडळीची पूर्ण खात्री आहे कीं, श्री साईबाबांनींच त्यांच्या अघटित मायेनें त्यांचें शेत बचाविलें.

(२) श्रीयुत काशीनाथ यांचा धाकटा भाऊ माझगांवांत पी. अँड ओ. कंपनीच्या कारखान्यांत फिटरकामावर आज कित्येक वर्षें नोकरीवर आहे.

सुपरिन्टेन्डन्ट साहेबांची त्याचें काम पाहून त्याच्यावर मर्जी आहे. असें असूनही गेल्या ऑगस्ट महिन्याच्या पंधराव्या तारखेच्या सुमारास साहेबानें त्याला अमुक बोटीवर जाऊन काम करण्याचा हुकूम केला, आणि सांगितलें कीं, बरोबर एक बिगारी घेऊन जा. असें काम करतांना दोन बिगारी असल्या-शिवाय तें होणें असंभवनीय असल्यामुळें त्यानें साहेबाला त्याप्रमाणें सांगितलें. साहेब ऐकेना. फारच रागावला व आपण स्वत: तें काम करावयाला गेला. आणि एक मजूर सोबतीस असल्यास हें काम होऊं शकतें हें दाखवितांना एक पंचवीस रुपयाचें हत्यार साहेबाच्या हातून पाण्यांत पडलें. झालें. वडयाचें तेल वांग्यावर. त्याचा घुस्सा काशीनाथाच्या भावावर काढला. दुसऱ्या दिवशीं त्याला कामावरून दूर केलें. त्यानें दुसरीकडे नोकरी मिळावी म्हणून सर्टिफिकेट मागितलें. पहिल्या तारखेनंतर देईन असें साहेबानें त्याला सांगितलें.

काशीनाथ म्हणतो कीं, त्याच्या कुटुंबांतील सर्व माणसें चिंतातुर झालीं. कारण कायमचा पगार मिळविणारा असा तो त्याचा भाऊ. स्वत: फुटकळकाम कोठें मिळेल त्यावर रोजीं मिळवून निर्वाह करणारा. तेव्हां पुढें होईल कसें याची सर्वांना विवंचना पडली.

याच वेळीं लेखकाच्या घरीं कांहीं सुतार काम निघालें होतें आणि त्या कामावर काशीनाथ याची योजना होती. एके दिवशीं संध्याकाळीं कोणी सद्-गृहस्थ लेखकाजवळ श्रींच्या हातची उदी मागावयासाठीं आले. त्यांना थोडी दिली. ते गेल्यावर लेखकानें काशीनाथाकडे पाहिलें. तो उभा होता. त्याच्या चर्येवर चिंता स्पष्ट दिसत होती. लेखकानें त्याविषयीं त्याला विचारलें; पण काशीनाथ कांहीं बोलेना. तेव्हां लेखकानें श्री साईमाउलीच्या हातची आपल्याजवळ असलेली थोडी उदी त्याला दिली आणि त्याला सांगितलें "काशीनाथ, ही उदी पूजेमध्यें जपून ठेव."*

काशीनाथ ती उदी घेऊन घरीं गेला. ऑगस्ट महिन्याची ३१ वी तारीख होती. त्या रात्रीं त्यानें आपल्या भावाला ती उदी खिशांत ठेवून दुसऱ्या दिवशीं साहेबाला भेटण्यास सांगितलें. त्याचा भाऊ ती उदी घेईना आणि

* पुढेंमागें या उदीविषयीं एखाद्या लेखांत खुलासा होईल.

म्हणाला कीं, उद्यां पहिल्या तारखेला आणखी पुष्कळ माणसांना रजा होणार आहे. काशीनाथानें आग्रह धरिला. भावाला सांगीतलें कीं, ही उदी तूं खिशांत ठेवच. आणि बाबांवर पूर्ण भरंवसा टेवून जा आणि साहेबांना भेट. बाबा आपलीं सर्व संकटें दूर करतील. तसें त्यांनीं नाहीं केलें तर अतःपर शिर्डीस जाणार नाहीं, असें त्रागायुक्त बोलून भावाला कारखान्याच्या दरवाज्यावर पाठविलें. तेथें जाऊन तो पाहातो तों ४०० ( चारशें ) माणसें कामावरून दूर केल्याचें त्याला दिसलें. त्याच्या छातींत धस्स झालें. साहेबानें त्याला पाहिलें. जवळ बोलावलें. कां आलास म्हणून विचारलें. त्यानें सांगितलें सर्टिफिकिटासाठीं आलों. साहेब म्हणाला, " तुला नोकरीवरून दूर करीत नाहीं. कामावर चल." असें म्हणून त्याच पगारावर त्याची नेमणूक केली.

काशीनाथानें ही हकीकत काल रोजीं ( ता. २-९-३१ ) लेखकाला सांगितली आणि म्हणाला "बाबासाहेब ! हा सर्व साईबाबांच्या त्या उदीचाच परिणाम आहे असें आम्हां सर्वांना वाटत आहे !" हें बोलतांना काशीनाथाचा कंठ सद्गदित झाला होता. ही हकीकत जशीच्या तशीच प्रसिद्ध करण्यांत लेखकाला साहजिक आनंद वाटत आहे.

**रा. आ. तर्खड**
संपादक—**श्री साईलीला.**

**ता. क.** दर पावसाळ्यांत छप्पर गळून तें पाणी श्रीसाईबाबांच्या समाधीवर पडून त्रास होत असे. हें गळतें बंद करण्यासाठीं तज्ज्ञांचा अभिप्राय घेतां छप्पराचा फेरफार करावा लागेल आणि त्यासाठीं किमानपक्षीं रु. ८०० ( रुपये आठशेंचा तरी ) खर्च पडेल असा अंदाज पडला. सध्यांचे सेक्रेटरी व कमिटीवरील दुसरे गृहस्थ यांना हें इष्ट न वाटून त्यांनीं काशीनाथाला या वर्षाच्या वैशाखांत इतर कामासोबत हें पण काम करण्यासाठीं पाठविलें आणि डांबर गरम करून मांजरपाटाचे तुकडे वापरून हें गळतें बंद झालें. खर्च पांचसहा रुपयांचा आला ! !

# अनुभव

ता. ६ नोव्हेंबर १९३१ रोजीं रा. ब. मोरेश्वरराव प्रधान यांच्या घरीं सांताक्रुझ येथें रा. सा. देव यांचे बरोबर संस्थानच्या कामासंबंधानें गेलों असतां श्रीयुत प्रधान यांनीं सांगितलेली गोष्टः—

" गेल्या जन्माष्टमीच्या दिवशीं आमचे (श्रीयुत प्रधान यांचे) घरीं श्रीसाईबाबांची कांहीं पुण्याची भक्तमंडळी आली होती. त्यांत श्रीयुत विठ्ठल यशवंत देशपांडे या नांवाचे गृहस्थ होते. त्यांनीं स्वतःसंबंधानें सांगितलेली हकीकत.

हे गृहस्थ सध्यां सुमारें २५।३० वर्षांच्या उमरीचे असावेत. यांच्या दहाव्या वर्षीं म्हणजे सुमारें १५।२० वर्षांमागें ही गोष्ट घडली.

त्यांचे आजोबा त्या वेळीं हयात होते, आणि दोन्ही डोळयांनीं अंध होते. त्यांना हात धरून फिरवावें लागत असे. एक तर वृद्धावस्था, आणि त्यांत अशी परावलंबनीय स्थिति. मग त्या जीवाला काय वाटत असेल तें तोच जीव जाणें.

आदल्या वर्षीं श्री विठ्ठलरावांचे वडील व त्यांची मातुःश्री शिर्डीला जाऊन श्रींचें दर्शन करून आलीं होतीं. त्यांच्या श्रीसाई माऊलीच्या उत्साह-पूर्वक कथानकावरून, आजोबांना स्फूर्ति झाली कीं, आपणही जाऊन श्रींच्या पायां पडावें. संतांचें सामर्थ्य अगाध असतें ह्याविषयीं म्हाताऱ्याची पूर्ण श्रद्धा आणि त्यांच्या कृपेनें कदाचित् गेलेली दृष्टि पुन्हांही मिळेल ही आस्था व इच्छा.

आमची घरची या वेळीं गरिबीच असल्याकारणानें आणि दुसरें कोणीही बरोबर नेणारें नसल्यामुळें आणि आजोबांच्या वारंवार अत्यंत केवि-लवाण्या विनवणीमुळें श्री विठ्ठलराव म्हणाले, माझ्या मात्यापित्यांना दया येऊन आणि श्रीसाईबाबांवर पूर्ण विश्वास असल्यामुळें आजोबांना शिर्डीस पाठ-विण्याचें त्यांनीं ठरविलें. आणि सोबत म्हणून **आमची** योजना केली !

मी तर त्यावेळीं केवळ नादान पोर ! वय सुमारें दहा वर्षांचें ! असें असूनही, माझ्या ताब्यांत अंध व वृद्ध आजोबांना देऊन, गाडींत झोंप न घेण्याची सक्त ताकीद देऊन नाशिक सोडल्यावर अमुक अमुक स्टेशनें येऊन नंतर मनमाडला उतरावयाचे आणि तिकडून दौंडाकडे जाणारी गाडी पकडून कोपरगांवला उतरावयाचें, तेथें टांगा करून शिर्डीस जावयाचें वगैरे पुनः पुनः एखाद्या धडयाप्रमाणें मला शिकवण देण्यांत आली होती.

मी तर केवळ एक लहान पोर ! स्वतः स्व त्र रीतीनें लांबचा प्रवास करण्याची ही पहिलीच वेळ ! त्यांतल्या त्यांत रात्रीचा प्रवास ! दोन अडीच वाजतां उतरून दुसरीकडे जाण्याची गाडी पकडावयाची आणि अंध व वृद्ध आजोबांचा सांभाळ करण्याची जबाबदारी ! ! !

गाडी सुटल्यावर पहिल्या पहिल्यानें आनंद झाला; पण पुढें पुढें तशांत रात्रीची वेळा असल्याकारणानें कंटाळा येऊं लागला. आजोबांना स्वस्थ झोंप घेण्याचें सांगून, मनमाड स्टेशनाकडे सारें लक्ष ठेवलें. न जाणों मनमाड चुकून पुढें कोठें गेलों तर परत कसें यावयाचें ही घोर चिंता !!

आजोबा तर स्वस्थ झोंपी गेले होते. डुलक्या खात खात तारवठ-लेल्या डोळ्यांनीं जेमतेत नाशीकचें स्टेशन पाहिलें. नंतर माझें थकलेलें शरीर झोंपी गेलें. मनमाड स्टेशनवर गाडी येऊन उभी राहिली. आम्ही उभयतां गाढ निद्रेंत. गाडी आतां सुटणार इतक्यांत, "उठ निजतोस काय ?" असे खणखणीत शब्द आजोबांच्या कानावर गाढनिद्रेंत पडले. ते धडपडत उठ-तात तों "मनमाड ! मनमाडवाला कोई है !" हे पोर्टरचे शब्द ऐकतांच, आजोबांनीं मला उठविलें. मी त्यांना धीर देऊन खालीं उतरविलें न उतरविलें इतक्यांत गाडी चालू झाली ! आजोबांना हे श्री साईबाबांचेच कानावर पडलेले झोंपेतले शब्द व हा त्यांचाच खास खेळ असें वाटून आनंद झाला. नंतर दौंडाकडे जाणाऱ्या गाडींत बसून, कोंपरगांव गांठून, टांगा करून श्रीगंगेंत स्नानें केलीं. आणि त्यानंतर शिर्डी गांठली.

दीक्षितसाहेबांच्या वाड्यांत उतारा करून आजोबांना हातीं धरून विचारीत विचारीत श्री साईबाबांच्या दर्शनाला गेलों, आम्ही दाघे दूर उभे राहिलों. आमच्याकडे पाहून बाबांनीं आम्हांला आपल्याजवळ बोलावलें. तेव्हां आजोबांना बाबांच्या पायांवर घातलें; आणि बाबांना सांगितलें, " बाबा ! यांना दिसत नाहीं ! " बाबा म्हणाले, " दिसेल रे ! "

घराहून निघतांना वडील म्हणाले होते कीं, "बाबा कदाचित दक्षिणा मागतील, ती त्यांना दे, नाहीं म्हणूं नकोस !" हें लक्षांत ठेवलें होतें.

वरील संभाषण होतांच बाबा मला म्हणाले " अरे ! दक्षिणा देतोस काय ?" मी म्हणालों, " देतों बाबा ! काय देऊं ? " बाबा म्हणाले, " चार रुपये दे ! " माझ्याजवळ पांच रुपयांची नोट होती ती काढून बाबांपुढें ठेवली. ते म्हणाले, " मला चारच रुपये पाहिजेत आणखी नकोत. "

तेव्हां तेथें असलेल्या मंडळी जवळ मोड मागितली. ती कोणाजवळ मिळेना; तेव्हां आवाराबाहेर पडून गांवांत मोड आणण्यासाठीं गेलों. गांव अपरिचित, वय लहान, केवळ पोर, त्यामुळें भटक भटक भटकलों.

इकडे बाबांनीं म्हाताऱ्याच्या डोक्यावर हात ठेविला. झालें ! म्हाताऱ्याला चांगलें दिसूं लागलें ! त्याच्या डोळ्यांतून आनंदाश्रू वाहूं लागले ! त्याला उदी घेऊन वाड्यांत जाण्याची आज्ञा केली. त्याप्रमाणें आजोबा दीक्षितांच्या वाड्यांत जाऊन बसले.

इकडे भटकून भटकून एकदांची मोड मिळाली, ती घेऊन बाबांकडे गेलों. चार रुपये त्यांच्या हातांत ठेविले, आणि आजूबाजूस पाहातों तो आजोबा कोठें दिसेनात ! घाबरलों ! अनोळखी गांव ! त्यांत अंध व वृद्ध म्हातारा आजोबा ! आईबापांनीं माझ्या ताब्यांत दिलेला आणि त्याची सांभाळ ठेवण्याची सक्त ताकीद ! या सर्व गोष्टी लक्षांत घेऊन माझ्या लहानशा जीवाला त्या वेळीं काय वेदना झाल्या असतील, त्याचें अनुमान करावें !

आवाराबाहेर धांवून कावऱ्याबावऱ्या " माझ्या आजोबाला पाहिलेंत काय ? " म्हणून रडत ओरडत जागोजाग पुष्कळ वेळ फिरलों, आणि थकून दीक्षितांच्या वाडयाकडे गेलों आणि पाहातों तों आजोबा चुनेबंदी बैठकीवर खुशाल बसलेले ! मला पाहातांच ते दुरून ओरडले, " अरे ! तूं इतका वेळ होतास तरी कोठें ? " त्यांना दिसूं लागल्याचें तर मला कांहीं वेळ खरेंच वाटेना ! नंतर खाणावळींत जेवण उरकून दोन प्रहरीं बाबांची रजा घेऊन आम्ही दोघे मुंबईस जाण्यासाठीं निघालों.

कोपरगांवीं गाडी मिळावयाची आशा नसतांच भलतीच एखादी गाडी मिळावी असे सर्वांच्या अनुभवाचे प्रकार घडून मनमाडला मुंबईकडील गाडी मिळून दुसऱ्या दिवशीं सकाळा दादर स्टेशनवर आलों.

महत्त्वाची एक गोष्ट सांगावयाची राहिली. आमची स्थिति त्या वेळीं गरिबीची होती, हें पूर्वीं कळविलेंच आहे. तशांत वडिलांनीं एक नवी करकरीत टोपी शिर्डीला जातेवेळीं मला घेऊन दिली होती, आणि सक्त ताकीद दिली होती, "पहा आपण गरीब माणसें ! टोपीला नीट जप. जर का ती गाडींतून पडून घालविलीस तर तुला मरे मरे तों मार देईन! समजलास !"

कर्मधर्मसंयोगानें मुंबई जवळ येत होती, इतक्यांत वाऱ्याच्या सपाटयानें माझी टोपी गाडींतून भुर्रकन् पार उडाली ! लहानच वय तें ! सडकून दहशत बसली कीं आतां आपलें पुढें कसें होईल ? मरे मरे तो मार खावा लागेल या फिकरींत असतां दादर स्टेशन आलें ! आम्ही दादरलाच राहात होतों. आम्ही दोघेही स्टेशनावर उतरलों. मीं टोपीच्या विवंचनेंत. आजोबा दृष्टि आल्याच्या आनंदांत ! त्यांच्याकडे लक्ष पोंहचवावें इतक्यांत उतारूंच्या गर्दींतन ते कोठच्या कोठें गेले.

मागाहून असें समजलें कीं, वाटेंत त्यांना कोणी स्नेही भेटले; त्यांनीं दृष्टि आल्याची अत्यंत आश्चर्यकारक अघटित घटना पाहून त्यांना प्रथम आपल्या घरीं नेलें होतें.

इकडे टोपी गेल्यामुळें मळकट रुमाल डोक्याला बांधलेली, छत्तीस तासांच्या व जागरणाच्या प्रवासाच्या आणि माराच्या भीतीनें काळवंडलेल्या अशा मुद्रायुक्त दर्शनें, आमची बालमूर्ति घराकडे मंदमंद पाउलें टाकीत गेली.

घरीं जातांक्षणींच प्रथम वडिलांचें दर्शन झालें. त्यांना पाहातांच माराच्या भीतीनें थरथरून मी टाहो फोडून रडूं लागलों. माझ्या खडया सुरांत रडण्याच्या आवाजानें घरांतील सर्व मंडळी धांवून आली आणि सोबत आजोबा न दिसल्यामुळें सर्वांना विपरीत घडल्याचें वाटून रडारड सुरू झाली.

त्यांतल्या त्यांत “ अरे ! पण झालें तरी काय ? बोल ? झालें तरी काय ? ” असें त्या गलक्यांत मोठमोठयानें ओरडत माझे वडील माझ्या जवळजवळ जसजसे येत, तेव्हां भीतीनें आमची स्वारी मोठमाठयानें आक्रोश करीत एकएक पाऊल मागें हटत असे, आणि त्याप्रमाणें इतर सर्वही मोठमोठयानें रडत ! !

हां हां म्हणतां आजूबाजूची सर्व मंडळी गोळा होऊं लागली ! प्रत्येकजण आपआपल्या कल्पनेप्रमाणें मोठमोठयानें बोलून रडूं लागले ! कोणाचा शब्द कोणाला ऐकूं येईना, असा एकच भयंकर कल्होळ झाला ! !

सद्‌गृहस्थहो, हें ऐकतांना आपल्याला स्वाभाविक रीतीनें गुदगुल्या होतात, परंतु माझ्या लहानग्या जीवाला त्या वेळीं काय झालें होतें ही आपल्या कल्पनेबाहेरची गोष्ट आहे ! !

असो ! हा खेदयुक्त प्रकार कांहीं वेळ चालला होता; इतक्यांत आजोबा तेथें आले.त्यांच्या हातांत एक छानदार टोपी होती. त्यांना पाहातांच

आणि दृष्टि आल्याचें समजतांच सर्वांना आणि टोपी मिळतांच मला काय आनंद झाला असेल याची तरी कल्पना आपल्याला होईल काय ?

श्री साई माउलीच्या पायीं मस्तक नमविण्याचा सुयोग त्यानंतर थोडयाच अवधींत आम्हां सर्वांना आला.

बाबांवर सेवकाची पूर्ण श्रद्धा जडल्यास आश्चर्य तें कोणतें ?

रावबहादूर,प्रधान म्हणाले, "बाबासाहेब ! श्रीयुत विठ्ठलराव ही हकीकत सांगत असतांना जर आपण त्यांची प्रेमाश्रुयुक्त चर्या पाहिली असती तर आपणांला कितीतरी आनंद झाला असता ! !"

वांद्रें ता. १६-९-१९३१ }

रा. आ. तर्खड
संपादक
श्री साई लीला.

# श्री कायम फंड खातें

| | | |
|---|---|---|
| १९३१ | | |
| जून | १७ अंक ५ पृष्ठ ५ | ५९७-१२-० |
| ,, | २३ कु. विमला देवी देसाई, बडोदें | ५--०--० |
| ,, | ,, स. भा. कुडाळकर, वांद्रें | १--०--० |
| ,, | ,, क्यापटन ( डा. ) व्ही. जी. हाटे, भवानगड | ५--०--० |
| ,, | २६ रा. रा. श्रीराम सदाशिव तांबे, नागपूर | ५--०--० |
| ,, | २७ एस. जी. परुळकर, अमीन, भिकणगांव | ५--०--० |
| जुलै | १ रा. सा. धोंडू मनोहर रत्नपारखी बेमेतारा | २--०--० |
| ,, | ,, आर. व्ही. पाटणकर, नाशीक | २--८--० |
| ,, | ३ रा. रा. नारायण नरसिंह फडणीस, जळगांव | ३--०--० |
| ,, | ५ ,, दाजी विठ्ठल सांबारे, पार्ले. ए. जून | ६--०--० |
| ,, | ,, ,, यशवंत ज. गाळवणकर, वांद्रें, जून | ५--०--० |
| ,, | ९ ,, आ. ला. आरोळकर, गुंटाकळ. जुलै । सेप्टें. | १०--०--० |
| ,, | ,, ,, एस्. एस्. पागनीस हस्तें. श्रीयुत सातबरे | २--०--० |
| ,, | १० क्यापटन (सर्जन) बा. रा. चांदोरकर, भंडारा. | १०--०--० |
| ,, | १४ रा. रा. लक्ष्मण गोविंद मुंगी, नाशीक | ५--०--० |
| ,, | ,, ,, आ. प. डोळस जुलै ते सप्टेंबर. | १--८--० |
| ,, | ,, सौ. अनीबाई दामू लक्ष्मण कोळी, खोचिवडें | १--०--० |
| | | ६६६--१२--० |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | ६६६–१२–० |
| ,, | १५ | रा. रा. डी. आर. खवणेकर. कोळीवाडी, मुंबई | ५–०–० |
| ,, | १६ | डा. एच् आर. क्लार्क, खंभात | १०–०–० |
| ,, | १८ | रा. रा. बाळकृष्ण रा. सावंत, वांद्रें | १–५–३ |
| ,, | २४ | डॉ. कांतीलाल त्रिभुवनदास क्लार्क, खंभात | १०–०–० |
| ,, | ,, | रा. रा. बी. के. चव्हाण, शहापूर | २–४–० |
| ,, | २६ | ,, रा. आ. तर्खड, वांद्रें. | ५–०–० |
| ,, | ,, | ,, लक्ष्मण गोविंद मुंगी, नाशीक | १–०–० |
| ,, | ,, | ,, रामचंद्र सीताराम देव, अंधेरी | १–०–० |
| ,, | ,, | ,, पांडुरंग जी. म्हात्रे. | १–०–० |
| ,, | ,, | " कृष्णाजी नारायण पेंडूरकर, कुर्ले | ५–०–० |
| ,, | ३१ | मे. शापुरजी तलाटी, धोबी तलाव. मुंबई | २–०–० |
| ऑगस्ट | २ | रा. रा. यशवंत ज. गाळवणकर, वांद्रें, जुलै, | ५–०–० |
| ,, | ,, | ,, मंगेशराव शिवाजी नायक साटम, देवगड | २–०–० |
| ,, | ,, | ,, दाजी विठ्ठल सांबारे. | ५१–०–० |
| ,, | ३ | ,, नारायण नरसिंह फडणीस, जळगांव | ३–०–० |
| ,, | ५ | ,, गजानन शिवराम पाटणकर, पारनेर | १०–०–० |
| ,, | ६ | ,, क्यापटन ( सर्जन ) भा. रा. चांदोरकर, भंडारा | १०–०–० |
| ,, | ,, | डॉ. छोटालाल मुलाभाई भट, मुरबाद | ५–०–० |
| ,, | ७ | रा. रा. दत्ताराम आनंदराव पितळे, मुंबई | १–४–० |
| ,, | ,, | ,, रा. व्ही. पाटणकर, नाशीक | २–८–० |
| ,, | ,, | ,, एस. व्ही. गुप्ते, कल्याण | १–४–० |
| ,, | ,, | रा. सा. डी. व्ही. परुळेकर, विरार | १–४–० |
| ,, | ,, | कु. इंदुबाई आर. चोणकर, बोरिवली. | ५–०–० |
| | | | ८०७–९–३ |

१२

| | | | |
|---|---|---|---|
| | | | ८०७—९—३ |
| ,, | | ,, रा. रा. शामराव आर. जयकर, पार्ले | ४--०--० |
| ,, | १० | ,, रा. बा. मोडक, पुणें | ५--०--० |
| ,, | ,, | ,, भिकाजी भोई तमासगीर | ६--०--० |
| ,, | १३ | ,, बापु श्रीकृष्ण महाजन, पुणें | २--०--० |
| ,, | ,, | क्यापटन ( सर्जन ) व्ही. जी. हाटे, भवानगड | ५--०--० |
| ,, | १६ | रा. रा. त्रिंबक गोविंद पाटील, भांडुप | १--४--० |
| ,, | | ,, सौ. उमाबाई परांजपे, ठाणें | १--०--० |
| ,, | ,, | श्रीमति राधाबाई पेंढारकर | ५--०--० |
| ,, | ,, | सौ उमाबाई देव श्री विलास शिरा जुलै | ५--०--० |
| ,, | ,, | ,, ,, ,, पेटी, जून | २--०--० |
| ,, | ,, | सौ. कमळाबाई देव श्री. वि. शिरा, आगस्ट | ५--०--० |
| ,, | ,, | ,, ,, ,, पेटी जुलै | २--०--० |
| ,, | २० | रा. रा. सेक्रेटरी मराठा प्राव्हिडंट फंड डिव्हिडंट | ५--१४--० |
| ,, | ,, | ,, बी. सी. बोरवणकर, ठाणें | २--२--० |
| ,, | ,, | श्री. राधाबाई पेंढारकर ,, | १--०--० |
| ,, | ,, | कै. राधाबाई देव, हस्तें रा. सा. देव | १--४--० |
| ,, | ,, | कु. ताराबाई नारायण गोरक्षकर, सान्ताक्रूझ | ३--०--० |
| ,, | ,, | सौ. बनूबाई शामराव धुरंधर | २—७—९ |
| ,, | | ,, रा.रा. साईभक्त. हस्तें वा. ना. गोरक्षकर, कल्याण | १०--०--० |
| ,, | ,, | ,, बाळकृष्ण राघव सावंत, वांद्रें | १--५--३ |
| ,, | २२ | ,, भिकू भोई तमासगीर, शिर्डी | ५--४--० |
| | | | ८८३—२—३ |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | ८८३—२—३ |
| ,, | ,, | ,, गजानन शिवराम पाटणकर | ११-५--३ |
| ,, | २६ | ,, रा. आ. तर्खड | ५--०--० |
| ,, | २१ | रा. सा. विनायकराव वामन राळे, पुणें | १०--०--० |
| सप्टेंबर | १ | रा. रा. जनार्दन आत्माराम देसाई, माटुंगें | १०--०--० |
| ,, | २ | रा. सा. आर. व्ही. पाटणकर नाशिक | २--८--० |
| ,, | ३ | रा. रा. नारायण नरसिंह फडणीस जळगांव | ३--०--० |
| ,, | ५ | ,, यशवंत जनार्दन गाळवणकर, वांद्रे आगस्ट | ५--०--० |
| ,, | ,, | दत्ताराम हस्तें य. ज. गाळवणकर | १--४--० |
| ,, | ६ | श्री. वेणूताई आगाशे हस्तें रा. सा. देव | १--०--० |
| ,, | ,, | रा. रा. गोखले. पेनशनर महाळकरी ,, | ४--०--० |
| ,, | ,, | सौ. कमळाबाई देव, श्री. वि. शिरा. सप्टेंबर | ५--०--० |
| ,, | ,, | ,, ,, ,, पेटी. ऑगस्ट | २--०--० |
| ,, | ,, | क्यापटन (सर्जन) भा. रा. चांदोरकर भंडारा | १०--०--० |
| ,, | ,, | डा. छोटालाल मुळाभाई देसाई, मुरबाड | ५--०--० |
| ,, | १० | रा. रा. विठ्ठल केशव केळकर, कल्याण | ५--०--० |
| | | रुपये | ९६३--३--६ |

# श्री भक्तमंडळ खातें

| | | | |
|---|---|---|---|
| १९३१ जून १२ अंक ५ पृष्ठ ६ | | | २११--०--० |
| जुलै | ३ | रा. रा. विश्वनाथ ल. नूलकर. पुर्णे, शके १८५३ | ५--०--० |
| ,, | ,, | ,, विनायक अप्पाजी वैद्य, अंधेरी १८५०-५१ | १०--०--० |
| ,, | १८ | डॉ. गोपाळ रामचंद्र जोशी, मोहपाडा | ५--०--० |
| ,, | २० | रा. रा. वासुदेव सीताराम सामंत, धुरिवाड | ५--०--० |
| ,, | ,, | ,, भिकाजी एन्. पंडित, तुरवाड | ५--०--० |
| ,, | ३१ | ,, आत्माराम ला. आरोळकर, गुंताकल १८५३ | ५--०--० |
| ,, | ,, | कु. शांताबाई ब्रम्हांडकर, ठाकुरद्वार | ५--०--० |
| ऑगस्ट | १० | रा: रा: गोविंद ल: पांढरे | ५--०--० |
| सप्टेंबर | ६ | ,, भाऊ बाळकृष्ण भाटे. मुलुंद | ५--०--० |
| | | रुपये | २६१--०--० |

# श्री. कोठी खातें

| | |
|---|---|
| १९३१ एप्रील १२ अंक ५ पृष्ठ ६ वरून | रु. ६--०--० |
| ,, जुलै २५ मे. डी. एम. राजा. | २--०--० |
| | रु. ८--०--० |

## श्री दत्तचित्साई सद्गुरुभ्योनमः

श्रीयुत श्री साईलीला संपादक महाशय यांस कृतानंत शि. सा. न. वि. वि. खालील पद्यास आपल्या विबुधमान्य श्री साईलीलेच्या एखादे अंकीं स्थळ द्यावें, अशी नम्र विनंती आहे.

# शैलधी अर्थात् शिरडी वर्णन.

(कटाव)

प्रेमे वंदावा साई सद्गुरु तो; संत विनायक तो, सद्गतिदायक तो ॥धृ॥

क्षेत्र शैलधी जीर्ण जुनाट, भोंवते श्रीगोदेचे पाट, कृष्णभूमि, मृदु, पीक अचाट, मटकी, मूग, मका-मसूरा, ज्वारिबाजरी, गहूं हरभरा, इक्षु[1] दंड जणुं चुंबि अंब[2]रा; तीळ खुरासणि करडि मोहरी, बागबगीचे फुलाफळांचे, कोठें कोठें पानवेलीचे, पिवळी धवळी गंध शेवती, मधू-मालती, नेवाळीचे घोस लोंबती, गुलाब गुलछडी गेंद मोगरा, जाईजुई मंदार कण्हेरी, बकूल चंपक नानारंगीं, तुलसी दुर्वा बिल्व सु[3]रंगी. लिंबू केळीं संत्रि फाकडी, खरबुज टरबुज मिठी काकडी, जांभ जांभळें. मधुर रसाळें, गोड रताळे, भुईमुग कांदा लसुण साजिरे, लाल गाजरें दुधे कोहळे, लाल भोपळे काशिफळें, तांबोटि दोडके, अळकोल गवारी, कारली भेंडी कोबी पडवळ, कृष्ण श्रावण शुभ्र घेवडा, मटार अबई गिल्कि बटाटा, चंदन बटवा अंबट चुका, अंबाडी अळुं चणा सुका, मूळा मेथी माठ चाकवत, घोळू भाजी बहुत ताजी, हिरवी मिरची हिरवी, चवळी करडइ कोथिंबिर ती कवळी, कोमल आंगी बारिक वांगी, यापरि वस्तु पिकती ऐसा भूमिभाग जो निर्मित करता प्रेमें वंदावा ॥ १ ॥

मशीद माई प्रचंड थाट, गर्जुनी गाठी गौतमि कांठ, भोंवता सद्भक्तांचा थाट, मध्यें आसन शुभ्र सपाट, पा[4]र्श्वी तक्के लोड सुदाट,

---

१ उंस २ आकाश ३ अती बारीक अत्यंत सुवासिक फुलें. ४ मागें

त्यावरी बैसे टेकुनि पाठ, विलसे संतांचा सम्राट, वसन खंड[1] शिरिं, वेष्टि निजकरीं, कपाळ[2] कफनी कौपिन[3] धारी, शांति विरक्ती निरिच्छ वृत्ति, हात जोडुनी उभ्या राहती, मोहमदादिक स्वप्नीं न शिवती, कृतांत भीती, भवभय वृत्ता, सुदूर पळती, आधि-व्याधी, त्या देहाला कधीं न बाधी, लोकसंग्रहासाठीं उपाधी, ब्रम्हानंदीं मग्न सदा जो, समाधान संतोष जलनिधी, सहज समाधी भोगि निरवधी, देहावरीही येई कधिमधीं, आर्त जनांना कधी औषधी, वेडिवांकडी, कोडि सांकडी, नमुनी पुसतां शीघ्र उलगडी, मात मनींची कथी तातडी, बोली बोले नानापरिची, विनोद थट्टा करी मस्करी, हांसे कोपे रुसे वरिवरी, क्षमानुकंपा पूर्ण अंतरीं, गाळि शिवी दे मारी सटके, फेंकी विटांचे फुटके कुटके, लागति ना मनिं अंगीं चटके, शिकवी गोष्टी वेदांताच्या, सांगे चुटके, श्रवणा लागती अमृत गुटके, कोपे जैं तैं कृतांत भासे, चंडरश्मिसम तेज प्रकाशे, फिरकूं ना दे कोणा जवळी, थरथर कांपे भक्तमंडळी, खदिर वन्हिसम विरक्त लोचन, रुद्र भयंकर प्रलय-विलोचन, स्थान सोडुनी जाई, भरभर धावे, परते, पुनरपि धांवे, पुनरपि परते, यापरि तांडव[4] करी क्षणभरी, शांत होउनी पुनरपि बैसे निज आसनावरि, धारण करि मग रूप मनोहर, वेणीमाधव अथवा यादव कुळिचें वैभव, कृष्णमुरारी देवकिनंदन कंस निकंदन, दुष्टविरंधन, व्रजवामा मन शीतल चंदन, मनमोहन मुरलीधर श्रीधर, मन्मथ सुंदर, हांका मारी कोमल वचनें, पुसे परोपरि, सटका अथवा वीट लागल्या जागीं चोळी, निज हस्तानें धरी कुरवळी, दवा सांगुनी वाटे लावी, ऐशा अद्भुत लीला करूनी दिपवी डोळे अखिल जगाचे, जनमय लावी सगुण भक्तिला, प्रेम उपजवी, ज्ञान शिकवी, ऐसा मंगल इश सदाशिव, ब्रम्हांडाच्या रंग भूमिवर, लीला नाटक निजभक्तांना नित्य दावि जो, प्रेमें वंदावा ॥ २ ॥

मशीद द्वारावती द्वारका, भक्तां प्लवं[5] भवजलधितारका, संत-दारिका, तोषकारिका, चित्तहारका, तीर्थनायिका, मोददायिका,

१ तुकडा २ खापराचा तुकडा. ३ लंगोटी ४ नाच. ५ नौका,

पापनाशिका, चिद्वि[1]काशिका, जेथ साई प्रेम उद्दंड, संभृत[2] इंधनें[3]
धुनी अखंड, प्रज्वलितानलशिखाप्रचंड, तेथ साई वास निशि-
दिनीं, शैलधि माजी आल्यापासुनी, प्रातःकालीं प्रातर्विधि-
निजसारे उरकुनि, लें[4]डीमाईवरि मग जाई, उपवन विटपा घाली
निर्मल, सलिल निजकरें, परतुनि येई मशिद द्वारके, वसुनि
निजासनिं फात्या मारी, पुनरपि जाई मग बाहेरी, ओली भिक्षा
एकचि वेळीं, प्रतिदिनिं मागे फक्त सकाळीं, पंचागारीं[5] अभिनव[6]
शिळी, भाजि भाकरी, चटणि साजिरी; पुनरपि येई आपुल्या स्थानीं,
प्रभातकालीं आठ नवाला, बालतमारी, प्राचि दिशेवरि, पसरी
जंव निज पेलव सुंदर, रश्मिपुंज अतिरम्य मनोहर, येई तेव्हां कांहीं
घरची, शुंठि शर्करा, दशमि भाकरी, बेसन लाडू, खीर साखरी,
नाजुक करिंचें साजुक तूप, विभिन्न पात्रीं येत अमूप, चटणि लोणचें,
झुणका शाक, अद्मोरें दहिं ताजें ताक, यापरि न्याहारी करुनि श्रीहरी,
चिलिम पेटवी, आपण पिउनी, इतरां देई, हिंदुकरवीं पूजा आरती,
नित्यनिरंतर त्रिकाळ घेई, मध्यान्हीं तशि सायंकाळीं, निशीथ समयीं
तो विधु[7]मौली, घरोघरीच्या नैवद्याच्या, ताटपानपत्रावळिवरती, लवण
लिंबु लोणचीं तऱ्हेचीं, कूटें तिखटें जाति जातिची, रुचिर रायतीं,
मधुर आयतीं, खिरें काकडया, मुळे खोबरें, किसून कोशिंबिरी फाक-
डया, परोपरीच्या उजू वाकडया, जागिं सांकडया, पंचामृत कोळाचे
स्वादु, मिष्ट रसांच्या पापड फेण्या, शुभ्र पापडया, वडे चिकवडया,
मिरची गिलकीं केळि बटाटा, पानाची तशि साखरबोंडें, कोहळा गाजर
डाळ सांडगे, वाम बाजुला, नानापरिच्या शाका भाज्या, उनून रुचकर
अगदीं ताज्या, भरीत देठी, जगजेठीच्या नैवेद्यास्तव, वडया अळूच्या
बहु तेलाच्या, पाटवडया चवकोनि पिंवळ्या सव्य बाजूला, यापरि
शृंगारूनि द्वयांग, सैन्य विभासे जणुं चतुरंग, मध्यें अंबेमोहर भात
विलसे जैसा मेदिनिनाथ, त्यावरि वरण पिंवळें दाट, शोभे कांचन छत्र

---

१ ज्ञानाचा विकास करणारी, २ भरलेली. ३ लांकडें ४ नाल्याचें नांव, ५ घरीं, ६ ताजा, ७ शंकर.